शनिवार, ९ मार्च २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १९७

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 9 MARCH 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-197 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## ऐतिहासिक सोहळ्याची ऐतिहासिक रांगोळी



अलिबाग : रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील वरसे येथे शिवराज्याभिषेक सोहळ्याची ३ एकर परिसरावर भव्य रांगोळी साकारण्यात आली आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या महा रांगोळीची विश्वविक्रमात नोंद व्हावी यासाठी प्रस्ताव पाठविला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून, या निमित्ताने राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून रोहा तालुक्यातील वरसे येथील भुवनेश्वर मैदानावर शिवराज्याभिषेक सोहळ्याची महा रांगोळी साकारण्यात आली आहे. १ लाख २५ हजार स्क्वेअर फूट परिसरात ही भव्यरांगोळी काढण्यात आली आहे. यासाठी गेले सहा दिवस शंभरहून अधिक रांगोळीकार दिवसरात्र मेहनत घेत होते. शुक्रवारी ही रांगोळी शिवभक्तांना पाहण्यासाठी खुली करण्यात आली.

## विजेचा धक्का लागून १७ मुले गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**कोटा :** महाशिवरात्रीनिमित्त शुक्रवारी देशभरात उत्सवाचे वातावरण होते. ठिकठिकाणी भगवान शंकराच्या मंदिरांमध्ये लोक दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. राजस्थानच्या कोटा शहरातही भगवान शंकराची मिरवणूक निघाली होती. मात्र या मिरवणुकीदरम्यान एक दुर्घटना घडली असून त्यात १७ मुलं भाजली गेली. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास कोटा शहरातील काली बस्ती याठिकाणी ही दुर्घटना घडली. कोटाच्या पोलीस अधिक्षक अम्रिता दुहन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ही खूपच दुःखद घटना घडली. काली बस्ती परिसरातील लोक महाशिवरात्रीनिमित्त कलशमध्ये पाणी भरण्यासाठी मिरवणूक काढत होते. यात २० ते २५ मुलं आणि तेवढ्याच संख्येने महिलाही होत्या. त्यातील एका मुलाकडे २० ते २२ फुटांच्या लोखंडी पाईपला लावलेला एक झेंडा होता. हा झेंडा रस्त्यावरील हायटेन्शन तारेला लागला. ज्यामुळे तो गंभीररित्या भाजला गेला. त्याला वाचविण्यासाठी इतर मुले पुढे सरसावले मात्र त्यांनाही विजेचा जोरदार धक्का बसला. एमबीबीएस हॉस्टिपलमध्ये सर्वांवर उपचार केले जात आहेत. दुहन पुढे म्हणाल्या की, ज्या मुलाच्या हातात झेंडा होता, तो गंभीररित्या भाजला गेला आहे. तर इतर मुलांनाही जखम झाली आहे. या घटनेची निश्चितच चौकशी केली जाईल. या घटनेनंतर कोटाचे खासदार ओम बिर्ला मुलांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी ते रुग्णालयातही पोहोचले.

# रोहित पवारांचा साखर कारखाना जप्त

## ईडीची कन्नड सहकारी साखर कारखान्यावर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : अजित पवार यांच्या बंडानंतर शरद पवार यांच्यामागे खंबीरपणे उभे असलेले युवा नेते तथा कर्जत जामखेडचे आ. रोहित पवार यांच्यावर ईडीने लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कारवाई केली. बारामती ॲग्रो कंपनीने खरेदी केलेला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात असलेल्या कन्नड सहकारी साखर कारखाना ईडीने जप्त केला आहे. ईडीने केलेल्या या कारवाईमुळे शरद पवार व रोहित पवार यांना लोकसभेपूर्वी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणी ही कारवाई केल्याचे सांगितले जाते. ईडीने कारवाई केलेल्या कारखान्याची किंमत ५० कोटी २० लाख आहे. तेथील १६१ एकर जमीनही ईडीकडून जप्त करण्यात आलेली आहे.**

कन्नड सहकारी साखर कारखाना दिवाळखोरीत निघाल्यानंतर राज्य सहकारी बँकेने लिलाव केला. हा कारखाना आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो लिमिटेडने ५० कोटी रुपयांमध्ये खरेदी केला होता. या प्रक्रियेमध्ये घोटाळा झाल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. याच प्रकरणी ईडीने बारामती ॲग्रोची चौकशी केली. रोहित पवार यांनाही ईडीने चौकशीसाठी बोलावले होते. या लिलाव प्रक्रियेतील कंपन्यांचे एकमेकांतले व्यवहार हे संशयास्पद असल्याचा ठपका ईडीकडून ठेवण्यात आला.
संबंधित लिलाव प्रकरणात बारामती ॲग्रो, हायटेक इंजिनिअरिंग, समृद्धी शुगर या कंपन्या सहभागी आहेत. हायटेक कंपनीने लिलावासाठी पाच कोटी रूपयांची रक्कम भरली होती. ती रक्कम बारामती ॲग्रोकडून घेतल्याचे बोलले गेले. विविध बँकांतून खेळत्या भांडवलासाठी घेतलेली रक्कम बारामती ॲग्रोने कारखाना खरेदीसाठी वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे.
या कारखान्याची स्थापना १९७३-७४ साली रामराव अण्णा बहिरागवकर यांचे चुलत भाऊ व त्यावेळी जालना औरंगाबादचे खासदार बाळासाहेब पवार यांनी केली होती. कारखाना दिवाळखोरीत होता त्यावेळी ८० कोटी कर्ज होते, त्यातील कर्मचाऱ्यांनी ३० कोटी भरले. मात्र ५० कोटीसाठी सहकारी बँकेने हा कारखाना सील केला होता.

माझ्या कंपनीवर ईडीने केलेल्या कारवाईचं ट्विट वाचले आणि



विचार आला आता भाजपामध्ये जायला पाहिजे का?, अशी प्रतिक्रिया देऊन रोहित पवार यांनी स्माईलीची इमेज टाकली आहे. पण भाजपाने लक्षात ठेवावें. झुकणारे आणि रडणारे गेले आता फक्त लढणारे शिल्लक आहेत आणि आम्ही अखेरपर्यंत लढू आणि जिंकू! माझ्यासारख्या स्वाभिमानी मराठी माणसाला गुडघ्यावर आणण्याची स्वप्न बघणाऱ्यांनी केवळ स्वप्नच बघावीत! या कारवाईवरुन आचारसंहिता येत्या दोन-तीन दिवसांतच लागेल, हेही दिसते, असेही रोहित पवार म्हणाले. रोहित पवार पुढे म्हणाले, ही कारवाई पूर्णत: बेकायदा असून याविरोधात न्यायालयात दाद मागितली जाईल, त्यामुळं कर्मचाऱ्यांनी कोणतीही काळजी करु नये. पण प्रश्न इतकाच आहे की, अशी कारवाई केवळ माझ्याविरोधातच का? पण सत्तेचा गैरवापर करणाऱ्यांना आज तरी असा प्रश्न विचारण्यात काही अर्थ नाही! वाढदिवसाच्या दिवशीही अशाच एका एजन्सीने कारवाई केली आणि आज महाशिवरात्रीच्या दिवशी दुसरी कारवाई.. परंतु मी महादेवाचा भक्त आहे अन्यायाविरोधात जनता जनार्दनरुपी महादेव तिसरा डोळा उघडेल तेंव्हा अनेकांच थयथयाट झाल्याशिवाय राहणार नाही.

## संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुरू केलेल्या सिध्देश्वर शिवरात्रीला माठांची खरेदी





आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके
पैठण : येथील गोदावरीच्या तीरावर सिध्देश्वर महादेव मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज भावंडासह काही काळ थांबले असल्याचे ग्रंथात उल्लेख आहेत. पैठणच्या प्राचीन सिध्देश्वर महादेव मंदिरातुन शिवरात्रीची सुरवात केली असुन आजही पैठण परीसरातील भाविक ईथे शिवरात्री निमित्ताने दर्शन घेवून मातीच्या भांड्याची खरेदी करतात.
थंडगार माठातलं पाणी ... मातीच्या भांड्यातील लोणचे अन् मातीच्या भांड्यातीलच ताक, दही .... आजही वेगवेगळ्या प्रकारच्या मातीची भांडी पाहिली की ग्रामीण जीवनशैलीची आठवण होते सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्याने या मातीच्या भांड्यांना शहरी भागातूनही मोठ्या प्रमाणात मागणी होत असुन शिवरात्रीला माठ खरेदी साठी भाविकांची गर्दी होती.
मातीच्या भांड्यांचा वापर हजारो वर्षांपासून केला जात आहे. मात्र वर्तमानकाळात जर्मन , स्टील 1 भांड्यांचा वापर वाढत गेला परिणामी मातीच्या भांड्यांची मागणी घटली, मात्र पुन्हा मातीच्या भांड्यांना मागणी वाढल्याचे दिसून येते . सध्या हळूहळू उष्णतेची तीव्रता वाढू लागली आहे ऐन उन्हाळ्यात गरिबांचा फ्रीज म्हणून मातीच्या माठांचा लौकिक आहे.



## उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्यानंतर समर्थांनी भारतभ्रमण केले. अवघ्या भारतवर्षाची पायी तीर्थयात्रा त्यांनी केली. या यात्रेत त्यांना जे भारतदर्शन घडले, त्याचा मोठाच परिणाम समर्थांच्या मनावर झाला. त्यांना भारतातील विदारक परिस्थितीचे दर्शन झाले. भारतातील लोक दारिद्र्याने पिचले होते. अंगात गुलामगिरीची वृत्ती भिनली होती. लोक स्वत्व, स्वाभिमान आणि स्वधर्म विसरले होते. मोगली सत्ता क्रूर, अन्यायी आणि अत्याचारी होती. तिला विरोध करण्याचे लोक जणू विसरूनच गेले होते. धर्म बुडाला होता. मंदिरे नष्ट होत होती. मूर्तींची विटंबना होत होती. स्त्रियांचे तर अनन्वित हाल होते. स्त्रिया सुरक्षित नव्हत्या. त्या अन्याय, अत्याचाराच्या बळी ठरत होत्या. त्यांचे संरक्षण करण्याचे सामर्थ्य असलेली मनगटे कमजोर पडली होती. आपल्या दुर्दैवाचे दशावतार पाहण्यापलीकडे सामान्य जनता दुसरे काहीही करू शकत नव्हती. ही भयंकर परिस्थिती समर्थ रामदासांना विषण्ण करून गेली. भारतभ्रमण करतेवेळी हिमालयात समर्थांना प्रभू रामचंद्रांचे दर्शन घडले. श्रीरामांकडून त्यांना धर्माच्या रक्षणासाठी कार्य करावे अशी प्रेरणा मिळाली होती. पुढे श्रीनगरमध्ये त्यांची भेट शिखांचे सहावे गुरु हरगोविंदसिंग यांच्याशी झाली. हरगोविंदसिंग आपल्याबरोबर दोन तलवारी बाळगत असत. शिवाय त्यांच्याजवळ सशस्त्र अशी फौज असे. हे पाहून समर्थांना आश्चर्य वाटले. त्यांनी त्याचे कारण विचारले. तेव्हा हरगोविंदसिंग म्हणाले, ' एक तलवार स्वसंरक्षणासाठी आणि दुसरी तलवार स्त्रियांच्या शील रक्षणासाठी आणि माझ्याजवळ असलेला फौजफाटा धर्माच्या रक्षणासाठी. जगात दुर्बलांना काही किंमत नसते. आपले संरक्षण आपल्याला करता आले पाहिजे. ' समर्थ त्यांच्या या विचारांनी प्रभावित झाले. यानंतर पुढे ते त्यांच्यासोबत सुवर्णमंदिरात गेले.




## आनंदी पहाट



### आपले मानसिक संतुलन दिनचर्येवर अवलंबून

आधुनिक केसरी

तुमचा समुदाय, कुटुंबातील सदस्य किंवा मित्रांपर्यंत पोहचणे त्यांच्याशी संपर्कात राहणे आवश्यक असते. तुमच्या भावना किंवा कोणत्याही चिंतांबद्दल तुमचा विश्वास असलेल्या एखाद्या व्यक्तीशी बोलावे. अर्थपूर्ण नातेसंबंधांमुळे आपुलकीची भावना निर्माण होऊ शकते. काळजी घेणे, मूल्यवान आणि समर्थित असल्याची भावना आपल्याला अधिक लवचिक बनण्यास मदत करू शकते. यालाच सामाजिक संबंध म्हणतात. इतरांशी संपर्क साधणे आपल्याला तणावाचा सामना करण्यास आणि अधिक लवचिक बनण्यास मदत करू शकते. दिवसभर विश्रांती घेतल्याने तणाव कमी होण्यास, तणाव कमी करण्यास किंवा चिंता कमी करण्यास मदत होऊ शकते. पण आपण अनेकदा कामामधून ब्रेक, थोडीसुद्धा विश्रांती घेत नाही. तुमचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी १० मिनिटेही पुरेशी आहेत. आज १० मिनिटे वेळ काढून स्वतःसाठी काहीतरी करणे गरजेचे असते. सांस्कृतिक, आध्यात्मिक किंवा धार्मिक कार्यांसाठी थोडातरी वेळ काढावा. तुम्हाला स्वारस्य असलेल्या संस्थांसह स्वयंसेवक म्हणून योगदान द्यावे. ह्या योगदानातून इतरांना परत देणे तुम्हालाही मदत करू शकते. इतरांसह घराबाहेर पडा, निसर्गाशी संपर्क साधा आणि हिरवीगार जागा शोधून निसर्गाच्या सानिध्यात राहून वेळ आनंदी बनवावा. शारीरिकदृष्ट्या निरोगी राहिल्याने तुमचे भावनिक आरोग्य सुधारू शकते. फळे आणि भाज्या, पातळ प्रथिने, सर्व प्रकारची कडधान्य आणि कमी किंवा चरबी नसलेले दुग्धजन्य पदार्थ घ्यावेत. अस्वास्थ्यकर चरबी, मीठ आणि साखर असलेले पदार्थ मर्यादित खावेत. दररोज रात्री लवकर झोपायला जावे आणि सकाळी लवकरात लवकर त्याच वेळी जागे व्हावे, जेणेकरून तुम्हाला चांगली झोप लागेल. प्रौढांना प्रति रात्र ७ किंवा अधिक तास झोपेसाठी आवश्यक असतात. प्रत्येक लहान शारीरिक क्रियाकलाप शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्या देखील मदत करते. सुरुवातील अल्पकालावधीचा प्रारंभ करावा आणि आठवड्यातून त्याचे प्रमाण तसेच वेळ वाढवत जावी.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी


### विठ्ठल सावळा | प्रगटला ||

फेर धरोनिया | नाचावे रींगणी ||
रमावे भजनी | विठोबाच्या ||१||
अभंगात रमे | भंडारा डोंगरी ||
विठ्ठलाची वारी | पंढरीत ||२||
नामाच्या किर्तनी | नाचे पांडुरंग ||
गायन अभंग | ज्ञाना करी ||३||
जीवीचा जीवात्मा | उभा विटेवरी ||
चंद्रभागे तीरी | संत मेळा ||४||
भक्तांचा जिव्हाळा | दाटला उमाळा ||
विठ्ठल सावळा | प्रगटला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज





गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### गीता


धर्म आणि संस्कृतीचा आत्मा भगवद्‌गीता हिंदू धर्म आणि संस्कृतीचा आत्मा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. म्हणूनच उपलब्ध ग्रंथभांडार बाजूला ठेवून ज्ञानेश्वरांनी भाष्य करण्यासाठी केवळ गीतेची निवड केली. गीता हे अवघ्या तत्त्वज्ञानाचे नवनीत असल्यामुळे त्या गीतेचे सेवन करण्यास ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. गितेस ज्ञानेश्वरांनी साक्षात माताच मानले आहे. गीतेची जगाला सर्वोत्तम देणगी म्हणजे निष्काम कर्मयोग. गीतेवर भाष्य करताना ज्ञानेश्वरांनी अलौकिक प्रतिभा अधिक फुलून येते.सर्व विद्यार्थ्यांचे मूळ पीठ, धर्माचे माहेर,शारदेचे लावण्य भांडार,विवेकतरुचे उद्यान अशा अनंत विशेषणांनी या मातेला ज्ञानोबांनी अलंकृत केले आहे. गीतेची सर्वश्रेष्ठता एका शब्दात ज्ञानदेवांनी वर्णन केली आहे,तो शब्द आहे वेदार्थसागर.गीता म्हणजे प्रकाश,मानवाने या दिव्य प्रकाशाचा एकदा तरी अनुभव घ्यावा आणि मार्गक्रमण करावे. उपनिषदे म्हणतात केवळ आत्मज्ञानानेच मोक्ष मिळतो परंतु गीतेचा असं नाही. गीता म्हणते अनन्य भक्ती केल्याने तुम्हाला मोक्ष मिळू शकतो. गीतेचे हे तत्त्वज्ञान जनसामान्यांना एक वरदान ठरले आहे.भक्तीने परमात्मा मिळतो हे भगवान भगवंताचे आश्वासनच सामान्य माणसास मोठे बळ देणारे आहे. जे मला भक्तीने पुजतात त्यांच्या ठाई मी आहे आणि माझ्याजवळ ते आहेत. हे भगवंताचे वचन सामान्यांना मोठा धीर देणार आहे. गीता सागराप्रमाणे अथांग आणि आकाशाप्रमाणे व्यापक आहे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेच्या माध्यमातून अवघ्या जगताला एक अलौकिक देणगी दिलेली आहे. गीतेच्या निष्काम कर्मयोगाची थोरवी अशी आहे की त्यासाठी संन्यासाची आवश्यकता नाही. कर्माच्या ठिकाणी जो अकर्म पाहतो व अकर्माच्या ठिकाणी जो कर्म पाहतो तोच खरा निष्काम कर्मयोगी.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्राकृत भूमी पास कर, मरमी भेदी सन्त । दिव्य दृष्टि तब खुलत है, सनमुख दृश्य अनन्त ।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/३८

मूळ भाष्याचा मराठी अनुवादः
अध्यात्मविद् अनुभवी संत जेव्हा योग विधानाद्वारे प्रकृती मंडलास पार करतात, तेव्हा त्यांची दिव्य दृष्टी उघडली जाते आणि त्यांना आत्म्याच्या सन्मुख अनंत सत्तेचा प्रत्यक्ष अनुभव होतो.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मनुष्याने प्रपंचात कसे वागावे ?

आधुनिक केसरी



खरोखर जगात माझे हित अगर अनहित करणारा जर कोणी असेल तर तो माझा मीच. ‘मी कर्ता’ ही भावना ठेवली की फळ भोगण्याची इच्छा राहते. मनुष्याला वाटत असते की, आपल्याला दुःख होऊ नये, आजारपण येऊ नये. पण तरीसुद्धा आजारपण आणि दुःख तो टाळू शकत नाही. म्हणजे ‘मी कर्ता’ ही जी आपली भावना असते ती निखालस खोटी ठरते. मालकी नसताना घराची मालकी गाजविण्याचा आपण प्रयत्न करतो याला काय करावे ! तेव्हा प्रापंचिकांत आणि संतांत फरक हाच की, ते कर्तेपण रामाकडे देतात आणि आम्ही ते आपल्याकडे घेतो. ‘राम कर्ता’ म्हणावे की सुख, कल्याण सर्व काही आलेच. त्याच्याकडे सर्व सोपवा आणि आनंदात राहा. त्यातच खरे हित आहे. गोड खायला देऊ नका असे डॉक्टरने बजावून सांगितले असताही रोग्याच्या इच्छेप्रमाणे गोड पदार्थ त्याला खायला घातला तर आपण त्याचे अनहितच करतो; तसे विषयाच्या लालचीने विषयाला बळी पडून आपले अनहित आपणच करून घेत असतो. आजारी माणसाला तीन गोष्टी कराव्या लागतात; एक, कुपथ्य टाळणे; दुसरी, पथ्य सांभाळणे; आणि तिसरी, औषध घेणे. तसेच भवरोग्यालाही तीन गोष्टी कराव्या लागतात. एक, दुःसंगती, अनाचार, मिथ्याभाषण, द्वेष, मत्सर वगैरे अवगुणांचा त्याग करणे; दुसरी, सत्संगती, सद्‌ग्रंथसेवन, सद्विचार आणि सदाचार असणे; आणि तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट, म्हणजे नामस्मरण करणे; हेच औषधसेवन होय. साधन हे वयावर अवलंबून नाही. मी केव्हा जाणार हे माहीत नाही, तेव्हा वयाने मी मला मोठाच म्हटले पाहिजे. आपण आपल्या जिभेला नामाचा चाळाच लावून घ्यावा. पहिल्यापहिल्याने विसरेल, पण सवयीने आपोआप आठवेल, आणि मग भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव होईल. साधनात थोडी बळजबरी पाहिजेच. नियम थोडा असावा, पण तो प्राणापलीकडे सांभाळावा. नियम जास्त केला तर तो चुकवता कसा येईल याचा मार्ग मन शोधायला लागते. नाम घेणे हेच भगवंताकडे चालणे होय. साधनेत पुढे आलेले आपण मागे जात नाही ना, याकडे लक्ष पाहिजे. नामाबद्दलची तळमळ कमी व्हायला बाहेरच्या कितीतरी गोष्टी कारण आहेत; रोजचा प्रपंच आहे, व्यवहार आहे, मागच्या आठवणी आहेत, पुढची काळजी आहे. अशात आपले नामस्मरण हट्टाने चालू ठेवले पाहिजे. नामात गोडी उत्पन्न व्हायला नामच घेतले पाहिजे. देवाला अत्यंत प्रिय जर काही असेल तर ते म्हणजे त्याचे नाम. ते घेतल्याने तो आपलासा होईल. देव तुम्हाला खात्रीने भेटेल. जसे पाणी गोठल्यावर बर्फ होते, तसे नाम घेतल्याने श्रद्धा घट्ट होते. श्रद्धेमुळे देवाला तुम्हाला भेटावेच लागेल. त्रिवेणीचा संगम जर कोणता असेल तर तो म्हणजे देव, भक्त आणि नाम. जिथे देव असेल तिथे भक्त आणि नाम असते आणि जिथे भक्त असतो तिथे नाम आणि देव असतो.

**६२. तुम्ही भगवंताच्या प्रेमाने अगदी भरून जा; आपापसांत प्रेम वाढवा.**

## कल्याण स्वामी

आधुनिक केसरी

समर्थ रामदासस्वामींनी एकदा ब्रह्मपिशाच्चाचे सोंग घेतले. तेव्हा कल्याण स्वामींनी त्यांची प्रार्थना करून त्यांना शांत केले. ते ठिकाण सज्जनगडावर 'ब्रह्मपिसा' या नावाने ओळखले जाते. समर्थ रामदासस्वामींनी एकदा ब्रह्मपिशाच्चाचे सोंग घेतले.
तेव्हा कल्याण स्वामींनी त्यांची प्रार्थना करून त्यांना शांत केले. ते ठिकाण सज्जनगडावर 'ब्रह्मपिसा' या नावाने ओळखले जाते. समर्थांनी शिष्यांची परीक्षा पाहण्यासाठी मध्यरात्री विड्याची पाने आणण्याची आज्ञा केली. समर्थांनी शिष्यांची परीक्षा पाहण्यासाठी एकदा मध्यरात्री विड्याची पाने आणण्याची आज्ञा केली. पण भर रात्री पाने आणायला कोणीही तयार झाले नाही. यावेळी कल्याण स्वामी तत्काळ निघाले, परंतु जंगलातून जात असताना त्यांना एका विषारी नागाने दंश केला. कल्याण स्वामी मूर्च्छित झाले. **क्रमशः**

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ९ मार्च २०२४

adhunikkesari.com


# ज्योतिष शास्त्रातील अलौकिक व्यक्तिमत्व : वैशाली गोलंदे



आधुनिक केसरी

पुण्याच्या सासवड गावातील लाडात वाढलेली .. मात्र पोलीस खात्याच्या शिस्तबद्ध परिवारातील मुलगी .. वैशाली गोलंदे ...लहानपणापासूनच पॉलिटिक्सची आवडअसल्यामुळे पॉलिटिकल सायन्स घेऊन मास्टर डिग्री तिने संपादन केली . सौ वैशाली शार्दुल गोलंदे विवाह नंतर संभाजी नगरात आली . मनात ज्योतिष शास्त्र शिकण्याची ओढ होती . वैशालीच्या मनात एक स्वप्न होतं की आपण ज्योतिष तज्ञ व्हावं ..आपल्या पतीला याविषयी तिन्ही बोलून दाखविले . उद्योगपती शार्दुल गोलंदे "जेनको सीड प्रॉडक्ट कंपनीचे" . मालक आपल्या पत्नीचे वैशालीच स्वप्न साकार करण्यासाठी तिच्या मागे खंबीरपणे उभे राहिले .

वैशाली गोलंदेनी नागपूरच्या. वेदांग ज्योतिष महाविद्यालयामधून एम. ए. ची डिग्री संपादन केली. त्यानंतर " महाराष्ट्र ज्योतिष परिषदेच्या मुंबई येथून ज्योतिष शास्त्री ही आणखीन एक डिग्री संपादन केली. वैशालीने केवळ आवड छंद म्हणून ज्योतिष शास्त्राचा अभ्यास सुरू केला होता. पण पती शार्दुलची साथ मिळाल्यानंतर ज्योतिष शास्त्रात उदंड यश संपादन केलं. त्यानंतर स्वतःच असं एक वेगळं वलय निर्माण केलं. अनेक डिग्रीतर प्रथम क्रमांक मिळवून प्राप्त केल्या. वैशालीने आपल्या ज्योतिष शास्त्राच्या छंदाचे रूपांतर नंतर व्यवसायात केलं.




वैशाली गोलंदेनी संपूर्ण महाराष्ट्रातील ज्योतिष शास्त्र परिषदेचे लक्ष आपणाकडे वेधून घेतलं. वैशालीच्या ज्योतिष शास्त्र विद्येचे पडघम संपूर्ण मराठवाड्यात वाजू लागले .त्याचे पडसाद मात्र संपूर्ण महाराष्ट्रात उमटले. वैशालीनी योगीराज ज्योतिष वास्तू अनुसंधानतर्फे. ज्योतिष गौरव व वास्तुश्री म्हणून गौरविण्यात आलं. त्याचप्रमाणे. योगीराज ज्योतिष वास्तु अनुसंधान संस्थेतर्फे तर. ज्योतिष महागुरु अशा उच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैशालीने महिला असूनही ज्योतिष शास्त्र ..वास्तुशास्त्रात या आगळ्या वेगळ्या क्षेत्रात जिथे केवळ पुरुषांचा दबदबा असतो. अशा क्षेत्रात तिने आपलं वेगळं असं स्थान निर्माण केलं. त्यांचे बरोबर बोलताना त्या पुढे म्हणाल्या ...वास्तविक मी डिग्री संपादन केल्यानंतर. रामटेकच्या संस्कृत महाविद्यालयातून मला नोकरीसाठी बोलविण्यात आलेलं होतं. त्याच शिवाय अनेक ठिकाणाहून नोकरीसाठी मला निमंत्रित आलेलं होतं .मात्र आपण ज्योतिष शास्त्र वास्तुशास्त्रातच पारंगत होऊन ज्ञानसंपन्न करायचं हे ठरवलेलं होतं. आपल्या ज्ञानाचा..आपल्या शास्त्राचा उपयोग समाजातील लोकांच्या समाज समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्हावा हिचं हृदयात तळमळ सदैव होती. त्यांच्या समस्या सोडवून त्यांना समाजामध्ये खंबीरपणे उभे राहता यावर म्हणून मी माझ्या ज्योतिषशास्त्राचा माध्यमातून सदैव अनेक लोकांना मदतीचा हात दिलेला आहे... त्याच बरोबर वैशाली गोलंदेही अत्यंत धार्मिक.. आध्यात्मिक अभ्याचा पाया असणारी..अत्यंत भावनाशील व्यक्ती असल्याचे तिच्या प्रत्येक बोलण्यातून जाणवते...

वैशाली गोलंदेचा मुलगा स्वरूप कॉलेजच्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. तर मुलगी सिद्धी ही बारावीचे शिक्षण घेत आहे. आपल्या आईच्या ". ज्योतिष शास्त्राच्या वीस वर्षाच्या " सुरू असणाऱ्या या व्यवसायात तिला मोलाचा हातभार हे दोघेही देत असतात असं वैशालीनी सांगितलं. वैशाली गोलंदे ही आपल्या ज्योतिष शास्त्रात पारंगत आहेच... त्याचबरोबर वैशाली उत्तम नृत्यही करते.. सुरेख रांगोळ्या काढते ..गृह सजावट अतिशय छान करते.. पाककलाही सुरेख करीत असते..त्याचबरोबर साऱ्यांचं आदरातीथ्य ती अतिशय मनापासून करते ..भविष्यातील संकल्पनेविषयी वैशालीला विचारला असतात ते म्हणाली ". ज्योतिष शास्त्र वास्तुशास्त्रात मला पीएचडी करावयाची आहे. संभाजी नगरातील या महिलेने ज्योतिष शास्त्र क्षेत्रात आपल्या नेत्रदीपक कार्यातून संपूर्ण महाराष्ट्रात अलोकिक असं स्थान निर्माण केलेलं आहे. वैशाली गोलंदे यांची भविष्यातील सारी स्वप्न साकार होण्यासाठी या. महिला दिनानिमित्त तिला आमच्या खूप खूप शुभेच्छा.!












सुधीर कोर्टीकर
मो. ९७६५५५३३१२
जुई, बी-६ अपार्टमेंट , तिरुपती पार्क, गुरुसाहनीनगर, सिडको, एन-४, छत्रपती संभाजीनगर


## चुकीच्या उपचारामुळे मुलाचा पाय बारीक

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** पेट्रोल पंपावर शिर्डी येथे मंजुरी काम करत असलेल्या सचिन काळे यांचा ९वर्षाचा मुलगा विराज काळे यास खेळत असताना बॉल मुळे इजा झाली होती उपचारासाठी त्यास साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे दाखल केले मात्र वडील सचिन काळे यांचा आरोप आहे की उपचार दरम्यान संबंधित डॉक्टरांनी चुकीच्या पद्धतीने इंजेक्शन दिल्याने मुलाचा एक पाय हालचाल करणे बंद झाला असून पंधरा दिवस झाले आहे साईबाबा हॉस्पिटलची चुक असताना उपचारासाठी सहकार्य सुद्धा केले जात नसुन एकमेकावर जवाबदारी ढकलत असल्याने मुलाच्या चितेत वाढ होत असल्याने न्याय मिळावा अशी मागणी सचिन काळे यांनी केली आहे जे दोष आहे त्या संबंधित डॉक्टर,नर्सेस यांच्यावर कारवाई व्हावी आणि पुढील उपचारार्थ खाजगी दवाखान्यात न्यावे लागणार असल्याने तेथील खर्च करण्याची माझी आर्थिक परिस्थिती नसल्याने साईबाबा संस्थान हॉस्पिटलने पुढील उपचाराचा खर्च करावा यासाठी निर्णय घ्यावा अशी मागणी रुग्णाचे वडील सचिन काळे यांनी केली या चौकशी साठी समिती केली आहे मात्र कधी चौकशी होईल कधी न्याय मिळेल तो पर्यंत माझ्या मुलाच्या जीवनाशी खेळु नका अशी आर्त हाक मुलाच्या आईची आहे जवाबदारी ही हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक शैलेश ओक यांनी समिती स्थापन केली असून समितीच्या अहवालात ज्याची कोणाची चूक दिसेल त्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल तसेच आम्ही रुग्णालय प्रशासनाकडून रुग्णाला आमच्या अधिकारात आहे सहकार्य करण्याची तयारी दाखवली असून त्यांनी केलेल्या मागण्या आम्ही वरिष्ठांकडे पाठवून या प्रकरणात लवकर कसा दिलासा आणि मदत मिळेल याबाबत प्रयत्नशील असल्याचे सांगितले आहे. चूक कोणाची यापेक्षा रुग्णाला सध्या ज्या उपचारांची गरज आहे ते तज्ञ डॉक्टर साईबाबा संस्थानच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये नाहीत तसेच डॉक्टरांची कमतरता असल्याने अनेक तक्रारी येत असतात घडलेल्या प्रकरणात अधिकारी वर्गाने वरिष्ठ आणि नियमांकडे बोट दाखवत जबाबदारी झटकने योग्य नसून असे प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत रुग्ण व नातेवाईकांनी व्यक्त केले आहे साईबाबा हॉस्पिटल मध्ये डॉ का टिकत नाही यासाठी त्रिस्तरीय समितीची स्थापना करून रुग्णाच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी पुढे आली आहे.



## विकासकामांसाठी तडजोड करणार नाही : आमदार प्रतिभा धानोरकर

### वरोरा-भद्रावती तालुक्यातील विकासकामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जनतेने आम्हा लोकप्रतिनिधींना शासन दरबारी पाठपुरावा करून सर्वांगीण विकास कामांना गती देण्याकरिता निवडून दिले असून विकास कामे करणे ही आमची जबाबदरी असल्याचे मत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले. या विकास कामांसाठी कधीही तडजोड करणार नसल्याची भावना आमदार प्रतिभा धानोरकर यांनी विविध विकास कामांच्या लोकार्पण व भुमीपुजन कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केल्या. शासनाच्या विविध निधी अंतर्गत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी आपल्या विधानसभा क्षेत्रात निधी खेचून आणला असून त्या निधी च्या माध्यमातून विविध कामांचे लोकार्पण व भुमीपुजन आमदार महोदयाच्या हस्ते करण्यात आले. आमदार स्थानिक विकास निधी, जिल्हा वार्षिक योजना निधी, अर्थ संकल्पीय निधी, ग्राम विकास निधी, जिल्हा वार्षिक आदिवासी उपाय योजना निधी, जन सुविधा निधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल डेव्हलपमेंट प्रोग्राम यासारख्या योजनेच्या माध्यमातून 43 कोटी रुपयाच्या कामांचे लोकार्पण व भुमीपूजन करण्यात आले असून यामध्ये सिमेंट कॉक्रीट रस्ते, समाज भवन, स्मशान भुमी संदर्भातील कामे, रस्त्यांचे खडीकरण व मजबूतीकरण, कर्मचाऱ्याची निवास स्थाने, नागरीक सुविधा कक्ष, स्ट्रीट लाईट, आरोग्य अधिकारी कार्यालय, प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम यांसारख्या इतर बांधकामाचा देखील समावेश आहे. जनतेने आपली केलेली निवड सार्थ ठरविण्याच्या उद्देशातून काम करणे गरजेचे असल्याचे मत देखील आमदार धानोरकर यांनी व्यक्त केले. जनतेच्या दालनात विकास काम करण्याची खरी कसोटी असून त्यासाठी जेवढे प्रयत्न करावे लागतील ते सर्व प्रयत्न करण्यास मी सक्षम असल्याची भावना देखील त्यांनी व्यक्त केली. वरोरा-भद्रावती नव्हेच तर कुठल्याही क्षेत्रातील कामासंदर्भात मी आढावा घेऊन विकासात्मक कामे करण्यासंदर्भात कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनतेला पाहिजे असलेला अपेक्षीत विकास आपण करण्यास कटीबध्द आहोत, असे उद्गार देखील त्यांनी भूमीपुजन व लोकार्पण प्रसंगी व्यक्त केले. तसेच भूमीपुजन केलेले कामे तात्काळ पुर्णत्वास नेण्याच्या सुचना संबंधित विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## लाच घेताना कोपरगावात दोन पोलीस लाचलुचपतच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनमधील दोन कर्मचारी लाचलुचपतच्या जाळ्यात पकडल्याची घटना ७ मार्च रोजी घडल्याने नगर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस अधीक्षक शर्मिला घारगे, अप्पर पोलिस अधीक्षक माधव रेड्डी, पोलीस उपअधीक्षक नरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्याकडे कोपरगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी पोलीस हवालदार संतोष लांडे व पोलीस शिपाई राघव कोतकर यांनी तक्रारदाराकडे पंधरा हजारांची लाच मागितली होती. जोडीअंती १२ हजार रुपये देण्याचे ठरले होते परंतु तक्रारदाराची पैसे देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत विभागाने सापळा लावला असता पोलीस स्टेशनमध्ये बारा हजार रुपये घेताना या दोघांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

## बालकाचा कुत्र्याच्या चाव्यामुळे मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज


**शिर्डी :** जन्मदात्या मातेने दोन महिन्याच्या बालकास थंडी असताना बाळाला थंडी वाजु नये याची काळजी घेत लगोट बांधुन बेवारस सोडून दिल्याने या बालकाचा कुत्र्याच्या हल्लात दुदैवी मृत्यू झाल्याचा प्रकार उघडकीस आल्याने शिर्डी शहरात मोठी खळबळ उडाली आहे पोलीसांनी सीसीटीव्ही च्या माध्यमातून मातेचा शोध घेतला असता तपास लागत नसल्याने बहुधा परराज्यातील तरुणीने या बाळास सोडून परागंदा झाली असावी असा कयास शिर्डी पोलीसांनी व्यक्त केला आहे.

आधिक माहिती अशी की शिर्डी शहरा लगत असलेल्या प्रसादालय पार्किंग लगत असलेल्या ओढ्यालगत एक ते दोन महिन्याच्या बालकास कुत्रे ओढत घेऊन जात असून कुत्र्यांना उसकावून लावले असून बाळाच्या अंगात निळ्या रंगाचे स्वेटर व लंगोट घातलेले आहे व कुत्र्यांनी बाळाचे लचके तोडलेले आहेत व मानेचा भाग देखील खाल्लेला आहे अशी माहिती सोमनाथ जाधव यांनी शिर्डी पोलिसांना देताच शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संभाजी पाटील व पथकाने तात्काळ ८ फेब्रुवारी २०२४ रोजी घटनास्थळी भेट देऊन प्रेताचा पंचनामा करत प्रवरा हॉस्पिटलमध्ये दाखल केले शवविच्छेदन अहवालात सदर लहान बाळास प्राण्यांनी तोंडास मानेवर चावा घेतल्याने शोषण नलिका व तोंडास व मानेस गंभीर दुखापती झाल्याने व प्राण्यांनी चावा घेतल्याने मृत्यू झाल्याचे अहवालात पुढे आले आहे रात्रीच्या सुमारास वरील ठिकाणी एक ते दोन महिन्याच्या बाळाला काळजी घेण्यास असमर्थ असलेल्या व त्यास उघड्यावर सोडून दिल्यास नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा प्राण्यांनी चावा घेतल्यास बाळाच्या जीवास धोका होऊ शकतो हे माहीत असताना बाळाचा त्याग करण्याचे हेतूने त्यास उघड्यावर सोडून दिले व त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अज्ञात आरोपीचे विरोधात शिर्डी पोलिसांनी भादवी ३०४,३१७ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून या घटनेने शिर्डी परिसरात मोठी खळबळ उडाली असून अधिक तपास सपोनि संभाजी पाटील हे करीत आहे.

# ओमर अब्दुल्लांची नाराजी

आधुनिक केसरी

संयुक्त जनता दलाचे प्रमुख नितीश कुमार यांनी पुढाकार घेऊन काँग्रेससह देशभरातील अनेक पक्षांना एकत्र आणून केंद्रातील नरेंद्र मोदींच्या सरकारविरोधात नवी आघाडी उभी केली होती. २६ हून अधिक पक्ष या इंडिया आघाडीत एकत्र आले होते. परंतु, जसजशी लोकसभा निवडणूक जवळ येऊ लागली तसतशी या आघाडीत बिघाडी निर्माण झाली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये काही छोटे पक्ष आघाडीतून बाहेर पडले आहेत. बिहारमध्ये नितीश कुमार यांचा संयुक्त जनता दल, उत्तर प्रदेशातील जयंत चौधरी यांचा राष्ट्रीय लोक दल आणि पंजाबमध्ये आम आदमी पार्टीने आघाडीला पाठ दाखवली आहे. आता काश्मीरमध्येदेखील तशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. काश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी इंडिया आघाडीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. अब्दुल्ला यांचा नॅशनल कॉन्फरन्स पक्ष इंडिया आघाडीतील त्यांचा मित्रपक्ष असलेल्या पीडीपीवर नाराज असल्याचे बोलले जात आहे. नॅशनल कॉन्फरन्सला पीडीपीला दिल्या जाणाऱ्या जागांवर आक्षेप असल्याचे बोललं जात आहे. अब्दुल्लांच्या मते पीडीपीला त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त जागा दिल्या जात आहेत. ओमर अब्दुल्ला म्हणाले, मी प्रसारमाध्यमांना यापूर्वीच सांगितलं होतं की, जो पक्ष मागच्या निवडणुकीत ज्या-ज्या मतदारसंघांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर होता त्यांना ती जागा मागण्याचा अधिकारच नाही. मला इंडिया आघाडीत सहभागी होण्याआधीच माहिती असतं की आम्हाला आघाडीतल्या इतर सदस्यांसाठी स्वतःला कमकुवत करावं लागणार आहे तर मी कधीच इंडिया आघाडीत सहभागी झालो नसतो. जम्मू काश्मीरमध्ये लोकसभेच्या पाच जागा आहेत. या पाचही जागा इंडिया आघाडीसाठी खूप महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. परंतु राज्यात इंडिया आघाडीतल्या तीन पक्षांमध्ये या जागांसाठी रस्सीखेच चालू आहे. फारुख अब्दुल्ला यांची नॅशनल कॉन्फरन्स पार्टी, महबुबा मुफ्ती यांची पीडीपी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे तीन पक्ष जम्मू-काश्मीरच्या पाच जागा वाटून घेणार होते. परंतु, आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) पक्षाने बिहारमध्ये थेट भाजपाबरोबर सरकार स्थापन करून आघाडीला पहिला धक्का दिला. त्यानंतर ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसशी जागावाटपावरून मतभेद असल्याचे उघड केले. त्यानंतर आता जम्मू आणि काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स या पक्षानेही स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याची घोषणा केली आहे. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे प्रमुख फारूख अब्दुल्ला यांनी गेल्या महिन्यात पत्रकार परिषद घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# अती विशिष्ट व्यक्तींच्या त्रासदायक भेटी

आधुनिक केसरी

**नुकतेच ट्रॅव्हल कंपनी तर्फे अंदमानला जाणे झाले.या भेटी मागचा सर्वांचा त्यातही सावरकर प्रेमीचा उद्देश असतो तो सेल्युलर जेल भेटीचा.इथे दोन जन्मठेपी च्या शिक्षा सुनावल्या गेलेल्या सावरकरांचे कष्टप्रद वास्तव्य होते. ती कोठडी बघणे,त्या स्मृती स्थळाचे दर्शन घेणे हा प्रमुख उद्देश असतो.पण तिथे गेल्यावर संयोजक जेलचे व्यवस्थापक यांनी जे सांगितले त्याने सर्वांना धक्काच बसला! आम्हाला सांगण्यात आले की आठवड्यात माननीय राष्ट्रपती महोदया या जेल ला भेट देणार आहेत.त्यासाठी रिपेअर, रंगरंगोटीचे काम सुरू आहे.शिवाय सुरक्षेचे कारण सांगितले गेले.**



आम्ही बाकीचा परिसर बघू शकतो.पण जिथे सावरकरांना ठेवले होते त्या कोठडी चे दर्शन घेता येणार नाही!

आम्हा सर्वांची घोर निराशा झाली.इथले बीचेस,इथली बेटे बघण्या पेक्षा सर्वांना या कोठडीची भेट जास्त महत्त्वाची होती.आम्ही सावरकरांचे साहित्य वाचले,अभ्यासले होते. काळे पाणी,माझी जन्मठेप यांची पारायणे केली होती. आम्हाला तिथे ने मजसी ने परत मातृभूमीला गायचे होते. जयोस्तुते म्हणायचे होते.पण आमच्या इच्छा आकांक्षा वर पाणी पडले.सारेच निराश झाले.

राष्ट्रपती कितीही मोठी व्यक्ती असली तरी त्यांच्या मुळे सामान्य लोकांना असे त्रास होणार असतील तर काय उपयोग? आपल्या देशात व्ही आय पी, व्ही व्ही आय पी चे नको तितके लाड केले जातात.यात राष्ट्रपती,पंतप्रधान,मुख्यमंत्री,इतर मंत्री ही मंडळी सुरक्षेच्या नावाखाली सामान्य जनतेला त्रास देतात.रस्त्याची वाहतूक थांबवली जाते.दर्शन स्थळे बंद ठेवली जातात..मार्ग रोखले जातात. विमानतळ बाकी प्रवाशांना तेव्हढ्या वेळे साठी प्रवेश बंद ठेवतात. अनेकांना इमार्जन्सी असते.दवाखान्यात जायचे असते. विशिष्ठ ठिकाणी वेळेवर पोहोचायचे असते.पण ही अती विशिष्ठ मंडळी, त्यांची अवास्तव सुरक्षा यंत्रणा सामान्य माणसांना दुय्यम समजतात.

खरे तर सेल्युलर जेलची रंग रांगोटी करायची गरजच काय? हे स्थळ त्यावेळी होते तसेच,त्याच स्थितीत पाहायचे असते. सावरकरांच्या कोठडीला किंवा इतर सेल च्या जमिनीला सिमेंटचा थर देणे हास्यास्पद वाटते.ज्या परिस्थितीत देश साठी बलिदान दिलेले स्वतंत्र सेनानी राहिले,त्यांनी जे आयुष्य भोगले ते य रंगरंगोटीने, सिमेंटिंग मुळे पुसुन टाकले गेले.विशेष म्हणजे राष्ट्रपतीच्या भेटी अगोदर एक आठवडा या पवित्र कोठडीचे दर्शन पर्यटकांना बंद करणे हा अन्याय आहे. इथे हजारो रुपये खर्च करून पर्यटक येतात.शेवटच्या क्षणी तुम्ही सांगता की सावरकर कोठडी बघता येणार नाही!असे निर्णय कोण ,कुठल्या पातळी वर घेतात? तथा कथित वी आय पी ला याची कल्पना असते का? त्यांची सामान्य जनतेला त्रास देण्यासाठी संमती असते का? त्यात आपल्याला मिळणाऱ्या या खास सुरक्षेचे,महत्वाचे यांना भूषण वाटते का?हे प्रश्न नेहमीच अनुत्तरीत राहतात.

इतर देशात ही अती विशिष्ठ मंडळी किती साधे पणाने राहतात याच्या सुरस कथा माध्यमात वाचायला, बघायला मिळतात.सायकल ने कार्यालयात जाणारे पंतप्रधान,सामान्य व्यक्ती सारखे हॉटेल कुटुंबासह जेवण घेणारे मंत्री,ज्याच्या साठी रस्ते,वाहतूक बंद होत नाही असे राष्ट्र प्रमुख..किती तरी उदाहरणे आहेत..पण सगळी बाहेरची.इथे य विशिष्ठ मांडली भोवती स्टेन गन धारी सुरक्षा कवच असते.मागे पुढे अनेक गाड्या चा ताफा असतो..तासभर ते ज्या ज्या मार्गे जाणार ते रस्ते बंद असतात.ते देवळात जाणार तर सामान्य व्यक्ती साठी तासन तास दर्शन बंद ठेवतात..हे असे य अती विशिष्ठ मंडळी चे लाड आणखी किती चालू ठेवायचे याचा विचार होणे गरजेचे आहे.सरकारी पातळीवर य सवलती बंद झाल्या पाहिजेत.हे सगळे जनतेने निवडून दिलेले जनतेचे सेवक आहेत. त्यांना जनतेला घाबरण्याचे काय कारण? मता ची भीक मागायला जातात तेव्हा कुठे असते सुरक्षा? मग मंत्री झाल्यावर सत्ते पदी बसल्यावर यांना का भीती वाटते सामान्य जनतेची? कशाला हवा गाड्यांचा ताफा, स्टेन गन धारी सुरक्षा? ज्यांना आपल्या जीवाचे भय वाटत असेल त्यांनी स्वतःचे पैसे खर्च करावेत सुरक्षे साठी.सामान्य जनतेला भुर्दंड नको.मुख्य म्हणजे यांच्या भेटीचा,हालचालीचा सामान्य नागरिकांना त्रास नको.

या निवेदना व्दारे माझी राष्ट्रपती,पंतप्रधान,सारे मुख्य मंत्री यांना नम्र विनंती आहे.त्यांनी आपल्या व्ही आय पी भेटी चा वायफळ खर्च बंद करावा.यांच्या सुरक्षेच्या नावाखाली सामान्य लोकांना कसलीही गरसोय होणार नाही,त्रास सहन करावा लागणार नाही असे कायदेच करावे..

मुख्य म्हणजे स्वतःच्या भोवती प्रसिध्दीचे वलय निर्माण करणारे सुरक्षा कवच बंद करावे. खर्च करून आलेल्या अंदमानला आलेल्या पर्यटकांना सावरकर कोठडी दर्शनाला एक आठवड्या नंतर येऊ घातलेल्या राष्ट्रपती च्या भेटी मुळे मुकावे लागते हे भारता सारख्या लोकशाही देशाला निश्चितच भूषणावह नाही. व्ही आय पी च्या नावाखाली होणारे फालतू लाड थांबले पाहिजेत एव्हढीच नम्र अपेक्षा..



जगन घाणेकर
मो. ९६६४५५९७८०

# प्रत्येक स्त्री सन्माननीय !

आधुनिक केसरी

**जागतिक महिला दिन म्हणजे स्त्रियांच्या सन्मानाचा, स्त्रीशक्तीला गौरवण्याचा दिवस. नुकत्याच पार पडलेल्या महिला दिनानिमित्त आपल्या कर्तृत्वाने यशाची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून निरनिराळ्या क्षेत्रांत उच्च पदे भूषवणाऱ्या महिलांचा यथार्थ सन्मान करण्यात आला. आजची स्त्री कोणत्याही क्षेत्रात पुरुषांच्या तिळमात्र मागे नाही हे सत्य मान्य करावेच लागेल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीचा उल्लेख शक्ती असा केला आहे. कोणत्याही कार्यासाठी शक्ती ही आवश्यकच असते. शक्तीविना सजीवता येत नाही. त्यामुळे केवळ समाजात आपले कर्तृत्व सिद्ध करणारी स्त्री सन्मानास पात्र नसून कुटुंबातील प्रत्येक स्त्री ही तितकीच सन्माननीय आहे.**

आज कोणत्याही घरात स्त्रीविना पान हलत नाही. नोकरी व्यवसाय करणाऱ्या पुरुषांना सप्ताहातून एक ते दोन दिवस सुट्टी मिळते; मात्र नोकरी करणाऱ्या किंवा न करणाऱ्या स्त्रीच्या नशिबी सुट्टी कुठे असते ? कार्यालयातून कितीही थकून भागून आली तरी घरी आल्यावर कुटुंबियांसाठी जेवण बनवणे, भांडी घासणे, घर आवरणे, कपडे धुणे यांसारखी कामे तिला करावीच लागतात. भगवंताने गर्भधारणेचा अधिकार केवळ स्त्रीला बहाल केला आहे, कारण गर्भाचे सुयोग्य पालन पोषण करणे, मरणप्राय प्रसूती वेदना सहन करून एका जीवाला जन्म देणे हे केवळ स्त्रीच करू शकते हे त्यालाही ज्ञात आहे. प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषाच्या मागे स्त्री असते असे म्हटले जाते ते खरेच आहे. कारण पुरुषाला त्याचे कर्तृत्व सिद्ध करण्याची मोकळीक देणारी, त्याच्या दैनंदिन गरज पुरवणारी, आजारपणात त्याची काळजी घेणारी आणि त्याला त्याच्या कार्यात प्रोत्साहन देणारी स्त्रीच असते, मग ती स्त्री पत्नी असो, आई असो वा बहीण असो. तिच्याविना त्याचे कर्तृत्व अधुरे आहे. हे झाले यशस्वी पुरुषांबद्दल. सामान्य घरांतही हीच स्थिती असते. स्त्री जरी कमावती नसली तरी घरातील सासू सासरे यांची काळजी घेणे, त्यांचे पथ्यपाणी, आहार विहार सांभाळणे, मुलांचा अभ्यास घेणे, आहारातील त्यांच्या आवडी निवडी जपणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, आजारपणात त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणे, त्यांचे लाड पुरवणे. घरातील दैनंदिन कामे वेळेत उरकणे, घरात काय हवे नको ते पाहणे, पतिकडून मासिक खर्चासाठी मिळणाऱ्या पैशांतून घर खर्चाचे गणित जुळवणे अशी कितीतरी कामे तिला न थकता न दमता प्रतिदिन करावी लागतात. हे सर्व करत असताना तिला होणाऱ्या शारीरिक त्रासांकडेही ती दुर्लक्ष करते, स्वतःच्या आवडीनिवडी बाजूला ठेवून घरातील इतरांच्या आवडी निवडींना प्राधान्य देते, स्वतःचे छंद, कौशल्य यांकडे दुर्लक्ष करते आणि हे सर्व वर्षातील ३६५ दिवस ती अविरतपणे करत असते, म्हणून सन्मान अशा गृहिणींचाही व्हायला हवा कारण तिच्याविना कटुंबाचे रहाटगाडे चालणे केवळ



अशक्य आहे. स्त्री जन्माला येते तेव्हाच तिच्या जन्मासोबत काही जबाबदाऱ्याही ती घेऊन येते. आपल्या शिलरक्षणाची जबाबदारी, आई वडिलांच्या नावाला बट्टा लागू न देण्याची, सदैव त्यांची मान ताठ ठेवण्याची जबाबदारी, विवाहानंतर पतीसह सासरच्या कुटुंबीयांची जबाबदारी, मुलांवर चांगले संस्कार घडवण्याची जबाबदारी, संसाराचे गाडे व्यवस्थित चालवण्याची जबाबदारी. आयुष्यभरात अशा कितीतरी जबाबदाऱ्या ती न चुकता, न कंटाळता यशस्वीपणे पार पडते. त्यामुळे महिला दिनाला केवळ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून चालणार नाही, तर प्रत्येक स्त्रीचा, प्रत्येक गृहिणीचा सन्मान केला जावा !

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# स्वकर्तृत्वातून सामाजिक प्रेरणा देणारी कलियुगातील संघर्षमय सावित्रीबाई ! सौ. शिल्पा कैलास गाडीलकर

आधुनिक केसरी

स्त्री ही पुरुषाच्या कलाकृतीला जशी प्रेरणा देते, तशी अधोगतीलाही कारणीभूत ठरते .हे चित्र सध्या पहावयास मिळत असताना .या समाजा मध्ये , कर्तुत्ववान मुलगा घडविणारी राजमाता जिजाऊ ,आपल्या खानदानीचा लढवय्या वारसा पुढे चालवणारी राणी लक्ष्मीबाई असो अहिल्यादेवी होळकर असो की स्त्री शिकली पाहिजे हे ध्येय समोर ठेवून स्त्री शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या व महात्मा फुलेंना पहिली मुलींची शाळा काढण्यासाठी मदत करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आसो हाच इतिहास पूर्ववत करणारी व सामाजिक भान ठेवून आपल्या कर्तुत्ववान पतीच्या संघर्षमय शैक्षणिक कार्यात सावली बनुन आधुनिक शिक्षण पद्धती ग्रामीण भागात प्रभावीपणे राबविणारी व शिक्षणापासून वंचित असलेल्या गोरगरीब जनतेच्या मुलांना व दर्जेदार शिक्षण पद्धतीत प्रवाहाबरोबर वाहत जाऊन विद्यादान करणाऱ्या समर्थ अकॅडमीच्या संचालिका व प्रिन्सिपल म्हणून सौ .शिल्पा गाडीलकर मॅडम यांचा उल्लेख करावा लागेल .



मुलगी शिकली प्रगती झाली, या उक्तीप्रमाणे एका मुलीमुळे अनेक घरांना आधार मिळतो प्रगती होते. या प्रगतीमध्ये तिची मानसिक, भावनिक गुंतवणूक असते. या गुंतवणुकी मधूनच स्त्री, मुलगी, माता, भगिनी ही सगळी नाती निभावत आपलं कर्तृत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करत असते.नशिबापेक्षा कर्तृत्वावर जास्त विश्वास असावा,कारण उद्या येणारी वेळ आपल्या नशीबामुळे नाही तर कर्तृत्वामुळे येते.ही दूरदृष्टी ठेवून हे कर्तृत्व सिद्ध करत असताना ती तन-मन-धन अर्पण करत आपले सर्व कर्तव्य पार पाडत असते. अशीच पारनेर तालुक्यातील एक कर्तृत्ववान स्त्री सौ.शिल्पा कैलास गाडीलकर !

आई -वडिलांचा आशीर्वाद,सासू-सासऱ्यांचे प्रेम,कर्तृत्ववान पती व दोन गोजीरवानी गोंडस मुले असा संसार करत असताना , सन २००७ सालापासून श्री.समर्थ अकॅडमी या शैक्षणिक संस्थेचा संसारही समर्थपणे सांभाळण्याचं काम सौ.शिल्पा करीत आहेत. " तुमचा आजचा संघर्ष तुमचे उद्याचे सामर्थ्य निर्माण करतो " त्यामुळे विचार बदला तुमचे आयुष्य आपोआपच बदलेल हा विचार करत व्यवस्थापन व मुख्याध्यापक या दोन्ही जबाबदाऱ्या योग्य रीतीने हाताळण्यात त्यांना यश आलेले आहे.घर ,शिक्षण आणि नोकरी या तीनही स्तरावर योग्य समतोल साधून त्या संस्थेचे संस्थापक संचालक कैलास गाडीलकर सरांना साथ करत आहेत. पैसे नसलेल्या माणसा पेक्षा स्वप्न नसलेला माणूस जास्त गरीब असतो.हा व्यवसायिक दृष्टिकोन ठेवत सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कटिबद्ध राहात आपल्या घरी आलेल्या प्रत्येक अतिथीला आपल्या भारतीय संस्कृती नुसार पाहुणचार केला जातो. चहा-पान व जेवण केल्याशिवाय कोणतीही व्यक्ती पुढे जात नाही.नवरा बायको व आपले आपत्य हा छोटासा " संसार " न करता,अहमदनगर-पुणे महामार्गावर,सासरे श्री. बाळासाहेब गाडीलकर (निवृत्त अधिकारी भारत सरकार टांकसाळ, मुंबई) सासुबाई सौ.विजयाताई गाडीलकर(संस्थेच्या माजी संस्थापक अध्यक्षा) मुलगा कविश व मुलगी अंशिता यांच्यासह संचालक कैलास गाडीलकर यांच्या सह सर्व शिक्षक वृंद , नातेवाईक , इष्टमित्र व सामाजिक कार्य करणाऱ्या शेकडो समाजसेवकांचा वापर असणाऱ्या घरात, " प्रपंच " करणाऱ्या मुख्याध्यापिका सौ.शिल्पा गाडीलकर यांचे कुटुंब म्हसणे (फाटा) याठिकाणी वास्तव्य करीत आहेत. जिवनात जिद्द सायंम आणि प्रामाणिकपणा असेल तर आपले अस्तित्व कोणीच संपवू शकत नाही. त्याप्रमाणे अतिशय छोट्या गावांमध्ये एक मोठं स्वप्न घेऊन हे दोघे आले . बी.एड.कॉलेज,डी.एड. कॉलेज,पॉलीटेक्निक कॉलेज तसेच इंग्रजी माध्यमाची प्री प्रायमरी ते बारावी पर्यंतची शाळा या ठिकाणी सुरू केली. स्वप्नवत




असणारी ही घटना पण प्रत्यक्षात उतरवण्याचे काम या दोघांनी केलं. हे करत असताना सौ.शिल्पा यांनी प्रत्येक ठिकाणी ,प्रत्येक अडचणीच्या टप्प्यावर मोलाची साथ दिली. आई-वडिलांकडून मिळालेलं ज्ञान,या ज्ञानाचा पुरेपूर वापर त्यांना झाला .पतीची समर्थ साथ असल्याने शिक्षण पूर्ण केलं. बी.ए बी.एड ,एम.एड ,डी.एस.एम.या सारख्या पदव्या उत्तम गुणांनी मिळविल्या. लहानपणी खो-खो,कबड्डी या खेळातही त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले होते. कबड्डी खेळात तर त्यांनी राज्यस्तरीय प्रतिनिधित्व केले.त्यामुळे शाळेतही खेळामध्ये खूप चांगल्या पद्धतीने क्रीडा क्षेत्रात विद्यार्थी घडविण्यासाठी त्यांना त्याचा उपयोग होत आहे. इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करताना पूर्णतः शाळेचे व्यवस्थापन हे सौ. शिल्पा यांनी पाहिलेले आहे.मुख्याधिपिका म्हणून काम करत असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध प्रकारचे कार्यक्रम राबविले जातात.शाळा नावारूपाला येण्यासाठी शाळेच्या मान्यता आणण्यापासून ते शाळेमध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यापर्यंत त्या नियोजन करत असतात. विविध मान्यवर व्यक्तींना भेटणे.त्यांना शाळेत बोलवण्यात सहभागी असतात.सर्व कार्यक्रमांच्या नियोजनामध्ये सक्रिय सहभाग घेऊन उत्तम रीतीने व्यवस्थापन सांभाळण्याचं काम मनापासून,आवडीने करत आहेत. आज संस्थेमध्ये जवळ -जवळ १००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सावित्रीचा वसा, जिजाऊचा लढाऊपणा, अहिल्येची उदारता या उत्तम उदाहरणांचा वारसा पुढे नेण्याचं काम.मुख्याध्यापिका सौ.शील्पा मॅडम करत आहेत.त्यांचे हे काम सातत्याने सुरू आहे. व ते सुरूच राहणार आहे . संस्थेच्या माननीय अध्यक्ष,सचिव,सर्व विश्वस्तांचे मार्गदर्शन आशिर्वाद तसेच बी.एड.महविद्यालयाच्या प्राचार्या,डॉ.अरुणा भांबरे मॅडम,मुख्याध्यापक श्री. देठे सर,प्रा.स्वाती मेहेत्रे मॅडम व इतर सर्व शिक्षकांच्या प्रेरणा घेऊनच हे काम करत असल्याने या कामांमध्ये प्रगती होत आहे. स्वतःच्या वास्तववादी परिस्थितीला जी माणसं स्वतःची ताकद बनवतात तीच माणसं कुठल्याही संघर्षाला सामोरे जात आयुष्यात कधीही अपयशी होत नाही. अशीच प्रगती करण्याची स्वप्न पुढे घेऊन सौ.शिल्पा मॅडम म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील कर्तुत्ववान स्त्री म्हणून संघर्षमय वाळवंटातील शितल पाण्याचा झरा असेच म्हणावे लागेल !

शब्दांकन : श्रीकांत चौरे



## किड्स किंगडम अकॅडमीने मुळा कारखान्यावर राबवला अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** महिलाच्या आरोग्य प्रश्नच्या बाबतीत मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दल आणि सुरक्षित पद्धतींबद्दल काय काळजी घ्यावी यासाठी तळागाळातील महिलाना अधिक माहितीव्हावी, हे महत्त्व लक्षात घेऊन किडस किंगडम स्कुलने मुळा कारखाना स्थळावर झोपडीत जाऊन ऊस तोड़णी महिलाना सुरक्षा म्हणून स्याणीटरी न्यापकिनचे वाटप मुख्यध्यापिका कीर्ति बंग यांच्या हस्ते नुकतेच वाटप करण्यात आले. आरोग्य स्वछ ठेवणे याची माहिती देणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच, लहानपणापासूनच मासिक पाळीबद्दल वाढलेले ज्ञान सुरक्षित पद्धतींमध्ये वाढ करू शकते आणि लाखो स्त्रियांच्या वेदना कमी करण्यात मदत करू शकते. ७ रोजी किड्स किंगडम अकॅडमी तर्फे गरजू (ऊस तोडणी कामगार) मुलींना तसेच महिलांना *२५० सॅनिटरी नॅपकिन्सचे* पॅकेट वाटप करण्यात आले. तसेच त्यासाठी मुख्याध्यापिका कीर्ती मॅडम,महिला शिक्षिका अमिषा बंब मॅम ,अश्विनी वरघट मॅम ,गौरी मॅम , राणी झोजे मॅम, काजल कसबे मॅम, निकिता मॅम, जयश्री वानी मॅम,पायल बंग मॅम तसेच प्रतीक्षा मचे मॅम यांनी त्यांना मासिक पाळी बद्दल विशिष्ट असे मर्गदर्शन करुन परिश्रम घेतले.



## महिला दिनानिमित्त डोमेगाव येथील सौ. सविता शेळके यांचा विशेष गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** स्वच्छता अभियानाचे महत्त्व गावाला पटवून देण्यासाठी स्वखर्चाने शौचालय बांधून दिलेल्या अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील सौ. सविता बाबासाहेब शेळके यांचा महिला दिनाचे औचित्य साधत अंबड येथील वीरचंद लालजी धरमशी इंग्रजी शाळा व वुमन्स प्राइड ग्रुपच्या वतीने डोमेगाव येथे यथोचित सत्कार करून तसेच सन्मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला .

आज महिला जगात आपले स्थान, मान सन्मान उंचावत आहे, एक महिला काय बदल करू शकते व किती बदल करू शकते याचे जिवंत उदाहरण म्हणजे सौ सौ सविता शेळके . अज्ञान अंधश्रद्धा आणि अस्वच्छतेचे उच्चाटन करण्यासाठी संत गाडगे महाराजांच्या स्वच्छता विचारांनी प्रेरित होऊन सौ सविता शेळके यांनी पुढाकार घेत प्रथम स्वतः साधी राहणीमान उच्च विचार अंगीकारत आपल्या कार्याला स्वतःच्या घरापासून ते गावापर्यंत स्वच्छता मोहीम राबवित आपल्या कार्याला सुरुवात केली त्यांनी केवळ गावासाठी आपली स्वतःची जमीन व मंगळसूत्र विकून 205 शौचालय बांधून संपूर्ण गाव हागणदारीमुक्त करून डोमेगाव (तालुका अंबड) येथील सौ सविता शेळके यांचे कार्य निश्चितच आदर्शवत ठरत आहे ,सौ शेळके यांनी केलेल्या या आगळ्यावेगळ्या कार्याच्या संघर्षाची यशोगाथा महाराष्ट्रासाठी एक आधुनिक स्वच्छता दूत म्हणून सर्वांना लक्षात घ्यावी लागेल, त्यांच्या या कार्यामुळे आज महिला दिनाचे औचित्य साधूत अंबड येथील वीरचंद लालजी धरमशी इंग्रजी शाळा व वुमन्स प्राइड ग्रुपच्या वतीने डोमेगाव येथे प्रत्यक्षात जाऊन सौ सविता शेळके यांचा यथोचित सत्कार करून सन्मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला .

यावेळी वीरचंद लालजी धरमशी शाळेच्या संस्थापक तथा मुख्यध्यापिका गितल धरमशी, हिना धरमशी,चैताली धरमशी,सौ अंजली अग्रवाल, रोहिणी जैन,रुचिरा जैन ,उर्मिला पैठण पगारे,नम्रता दखणे, सौ चित्राल भाग्यश्री जैन,सौ, मगर, तसेच अंगणवाडी कार्यकर्त्या शोभाबाई रणमळे, अंगणवाडी मदतनीस अर्चना खांडेभराड ,मिनी अंगणवाडी कार्यकर्ती छायाबाई जटाळे ,आशा कार्यकर्त्या मंगल लहामगे, गंगुबाई लहामगे, आशाबाई साळे, यमुनाबाई गुलगे, द्वारकाबाई जाधव ,द्वारकाबाई शेळके, मीरा शेळके रुक्मिणीबाई जाधव आदींची उपस्थिती होती.यानंतर महिला दिनानिमित्त वृक्ष लागवडही करण्यात आली.



## मविप्र पत्रिका कृषी विशेषांक प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** ११ वे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन नुकतेच दिनांक सह्याद्री फार्म मोहाडी येथे संपन्न झाले. याप्रसंगी मविप्र संस्था निर्मित मविप्र पत्रिकेच्या कृषी विशेषांकाचे प्रकाशन प्रसिध्द अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाध्यक्ष साहित्यिक भानू काळे, जेष्ठ शेतकरी नेते रामचंद्रबापू पाटील,सह्याद्री फार्म चे चेअरमन विलास शिंदे,मा.आ.सरोजताई काशीकर,ॲड. वामनराव चटप,गंगाधर मुटे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे ,सभापती बाळासाहेब क्षीरसागर,उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी,उपसभापती डी बी मोगल,संचालक प्रविण जाधव, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब भाकरे, डॉ. आय.बी. चव्हाण व इतर मान्यवर उपस्थित होते. मविप्र हि महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था असून संस्थेचे सभासद हे मुख्यत्वे करून ग्रामीण भागातील व शेतकरी आहेत. शेतकरी जीवन हे खडतर असून शेतीसमोरील समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना स्वतःचे मार्ग शोधावे लागतील.कच्च्या मालाचे रुपांतर पक्क्या स्वरूपात करून शेतीमध्ये सुधारणा करता येईल. शेतकऱ्यांमध्ये मोठी क्षमता असून मविप्र कृषी विशेषांक हा जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच मविप्र संस्थेच्या माध्यमातून दर शनिवार उदाजी मराठा बोर्डिंग येथे शेतकऱ्यांना भाजीपाला व कृषी विक्री साठी उपलब्ध करून दिला आहे. मविप्र संस्थेच्या कृषी महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण व ज्ञानदानासोबतच शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाईल. मविप्र कृषी विशेषांकाचे अतिथी संपादकाची जबाबदारी हि सह्याद्री फार्म चे चेअरमन विलास शिंदे यांनी सांभाळली असून या अंकात कृषी क्षेत्रातील मान्यवरांच्या लेखांचा तसेच कृषी क्षेत्रातील संधी याबाबत मार्गदर्शन केलेले आहे.

## नाशिकमध्ये पुन्हा बिबट्यांची दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पंचवटीतील मखमलाबादजवळील वडजाईमाता नगरात एकाच वेळी तीन बिबट्यांचा मुक्त संचार सुरू असल्याचे उघड झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वी बिबट्याने घोड्याच्या शिंगरुला मारले होते. रात्री कुत्र्यांवर हल्ला केला. स्थानिकांनी फटाके फोडून बिबट्यांना पळविण्याचे प्रयत्न केले. मात्र गुरुवारी सकाळी पुन्हा बिबट्या दिसला. या घटनाक्रमाने परिसरात भीती आहे. सकाळी घराबाहेर पडण्यास कुणी धजावत नाही. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी या भागात आधीपासून दोन पिंजरे लावण्यात आले आहेत. आता आणखी एक पिंजरा लावला जात असल्याचे वन विभागाने म्हटले आहे. मखमलाबाद हा निवासी वस्ती, द्राक्षबागा, शेतमळ्यांचा परिसर आहे. याआधी परिसरात अनेकदा बिबट्यांचे दर्शन घडले आहे. बुधवारी रात्री मात्र एकाच वेळी तीन बिबटे नागरी वस्तीत शिरल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. वडजाईमाता नगरात माजी महापौर अशोक मुर्तडक यांची शेती आहे.

# प्राचार्य एन.बी. चापे यांच्या कर्तृत्वाचा गुणगौरव - आधारवड

## || मंथनाचे पैलू ||






डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ३२

गुरुवर्य "प्राचार्य नामदेवराव चापे" सरांच्या एकूण कारकीर्दीचा आलेख नोंदणवणारा गौरवग्रंथ "आधारवड" प्राचार्य-एन. बी.चापे' या शीर्षकांतर्गत छापून तयार झालेला आहे. आमचे ज्येष्ठस्नेही सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा.शिवाजी वाठोरे यांनी संपादित केलेला 'गौरवग्रंथ' त्यांच्या नांदेड-छ.संभाजीनगर प्रवासात चार दिवसापूर्वी मंठ्यात झालेल्या भेटीत..... प्रस्तुत ग्रंथ मला भेट म्हणून सुपुर्द करून त्यावर प्रकाश टाकण्याचा आग्रह केला. सन्मित्र प्रा. शिवाजी वाठोरे सरांच्यासमोर मी माझी काही कारणे ठेवली; परंतु त्यांनी ती मोडीत काढली... मीही त्या कारणांना बाजुला ठेवून होकार दिला. ९ मार्च ही प्रकाशनाची तारीख आहे. कुठल्यातरी वृत्तपत्रात ९ मार्च रोजी या गौरवग्रंथावर परीक्षण लिहून यावे, ह्या गोड धाकापोटी अगदीच घाईत केलेला हा लेखनप्रपंच....! "आधारवड" या गौरवग्रंथाच्या निर्मितीसाठी प्रा. शिवाजी वाठोरे यांनी पुढाकार घेऊन गौरवग्रंथाच्या संपादनाची मुख्य भूमिका पार पाडली आहे. गौरवग्रंथ सर्व बाजूंनी सुंदर व आकर्षक झालेला आहेच. तसे पाहता गौरवग्रंथाच्या निर्मितीमागे अनेकांचे हात लपलेले असतात; मुख्य भूमिका पार पाडणाराचाच सहभाग लौकिकार्थाने समोर येतो. खरेतर 'गौरवग्रंथ' त्यांचाच काढला जातो.. ज्यांचे कार्य अद्वितीय, अविस्मरणीय आणि समाजहिताचे असते. ज्यांनी समाजातील अनेक गरजुंना, दुर्बलांना मदतीचा हात दिलेला असतो, जे आंधळ्याची काठी झालेले असतात. "आपण समाजाचं देणं लागतो..!" ही जाणीव व सहानुभूती ज्यांच्या ठायी असते. केवळ सहानुभूतीच नव्हे, तर त्याहीपुढे जाऊन ज्यांचा वरदहस्त अनेकांना प्रतिकुल आयुष्यात उभे करण्यासाठी कामी येतो. अशाच माणसांच्या कर्तृत्वाचा गौरव केला जातो. अशाच एका कर्तृत्ववान व्यक्तीचे नाव आहे... प्राचार्य एन.बी. चापे सर... ते आपल्या वयाची पंचाहत्तरी ओलांडत आहेत... हे औचित्य साधून त्यांच्या कारकीर्दीचा आलेख वाचकांसमोर ठेवण्याचा प्रा.वाठोरे सरांचा हा यशस्वी प्रयत्न. "आधारवड" हा सुंदर ग्रंथ तयार झाला आहे. गौरवग्रंथाच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध कंगोरे उलगडणाऱ्या जवळजवळ सत्तावन्न लेखकांचे लेख प्रस्तुत ग्रंथात आहेत. त्यामध्ये त्यांचे काही सहकारी आहेत, तर काही विद्यार्थी आहेत, तर काही सामाजिक चळवळीत काम करणारे लेखकही आहेत.

ग्रंथात सुरुवातीला चापे सरांच्या दिवंगत आईवडीलांच्या व नातेवाईकांच्या पुण्यस्मरणाच्या स्मृती जागविल्या आहेत. "इतिहासाच्या सोनेरी पानात नोंदी नसलेल्या असंख्य दुर्लक्षित कर्तृत्ववान माणसांना हा ग्रंथ अर्पण" केला आहे. या ग्रंथाला श्री चापे सरांचे विद्यार्थी,महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्याक विकास, औकाफ व पणनमंत्री मा.अब्दुल सत्तार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. श्री चापे सरांचा आणि माजी मंत्री अब्दुल सत्तार यांचा स्नेहबंध अगदी जवळचा आहे.

ग्रंथाचे संपादक प्रा.शिवाजी वाठोरे सरांच्या मनोगतापूर्वी प्राचार्य एन.बी.चापे सरांची वंशावळ नोंदवली आहे. यापूर्वी कोणत्याही गौरवग्रंथात अशाप्रकारे वंशावळीची माहिती आलेली नव्हती; मात्र या ग्रंथात वंशावळीची नोंद आवर्जून घेण्यात आलेली आहे. प्राचार्य एन.बी.चापे, अर्थात नामदेवराव चापे सरांचे नाव समोर आले की, आठवू लागतो त्यांचा पोशाख, त्यांचे राहणीमान, त्यांची सहजबोली, आढेवेढे न घेणारा स्वभाव, त्याचबरोबरच त्यांच्यातील शिस्तप्रियता, बाणेदारपणा, समाजशीलता, विद्याव्यासंग, प्रामाणिकपणा, एक प्रगल्भ मार्गदर्शक, सहृदयी सहकारी, सकारात्मक




विचारधारेचा झरा, अशा अनेक उपाध्या लागलेले कैकांचे अण्णा म्हणजे प्राचार्य एन.बी चापे सर. प्रस्तुत गौरवग्रंथात अनेकांनी सरांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला आहे. त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू ह्या गौरवग्रंथामधून उलगडले आहेत. ते पैलू ग्रंथ हाताळल्यानंतरच समोर येतात. चापे सरांचा खेड्यात व शेतकरी घराण्यात झालेला जन्म, सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती. बालपणीच आईचे छत्र हरवल्यानंतर मामाकडे राहून घेतलेले प्राथमिक शिक्षण. नंतर मॅट्रिक उत्तीर्ण. तद्नंतर १९७० च्या आसपास औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी व मराठवाडा विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण.... असा हा प्रतिकूल परिस्थितीत सरांच्या शिक्षणाचा झालेला एकूण प्रवास. सिल्लोड येथे नव्यानेच स्थापन झालेल्या राजर्षि शाहू शिक्षण संस्थेअंतर्गत यशवंत कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात सरांचे १९७२ मध्ये अधिव्याख्यातापदी रुजू होणे. पुढे उपप्राचार्य आणि त्यानंतर प्रभारी प्राचार्य आणि कायम प्राचार्य व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी म्हणून जबाबदारी. त्यांच्यामधील आत्मविश्वास, सचोटी, प्रशासकीय कामकाजाचे नियोजन व शिस्तबध्द कर्तव्यदक्षता या गुणांमुळे संस्थेचा व संस्थाचालकांचा विश्वास संपादन.. संस्थेनेही त्यांच्यावर विश्वास टाकून अनेक पदाच्या रुपाने त्यांच्याकडे अनेक जबाबदाऱ्या सोपवल्या. त्या जबाबदाऱ्या त्यांनी दीर्घकाळ पेलल्या व यशस्वीपणे पार पाडल्या.

सरांनी प्राचार्य पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर महाविद्यालयास उत्कर्षाच्या दिशेने नेण्याचे काम केले. संस्थाचालकांचा विश्वासू माणूस म्हणून संस्थेचा वाढता पसारा सांभाळण्याची जबाबदारी सरांनी बिनदिक्कतपणे स्वीकारली. तीन वरिष्ठ महाविद्यालये व सोळा माध्यमिक व उच्च प्राथमिक शाळा आपल्या कर्मचारी सहकाऱ्यांच्या भरोशावर व संस्थाचालकाच्या मार्गदर्शनाखाली विस्तारीत केल्या. संस्थेने दिलेल्या अनेक जबाबदाऱ्या येणाऱ्या अडचणीवर मात करून यशस्वीपणे पार पाडल्या. त्यांचे संस्थाचालक सहकारमहर्षी माणिकराव दादा पालोदकर अशा मोठमोठ्या व्यक्तींच्या सोबत श्री चापे सरांनी काम केले.

ग्रंथातील माहितीनुसार प्राचार्य नामदेवराव चापे सर हे पांडुरंगशास्त्री आठवले यांनी सुरू केलेल्या स्वाध्याय चळवळीत काम करत होते. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक,आध्यात्मिक, तात्विक, सात्विक अशा विविध अंगाने त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झालेली आहे.. म्हणून प्रज्ञा, शील आणि करुणा श्री चापे सरांच्या ठायी आहे. ती अनेकांनी अनुभवली आहे. श्री चापे सरांच्या मार्गदर्शनामुळे, सहकार्यातून विद्यार्थ्यांना, मित्रांना, गावबंधुंना आयुष्यात उभे राहता आले आहे. त्यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी व निष्ठेतून या ग्रंथात प्रथितयश लेखकांनी, विद्यार्थी लेखकांनी व सहकारी मित्रांनी त्यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. ग्रंथाचे शेवटी संपादक स्नेही प्रा.शिवाजी वाठोरे यांनी घेतलेली श्री चापे सरांची प्रदीर्घ मुलाखत आहे. त्यांना मिळालेल्या काही पुरस्कारांच्या नोंदी आहेत. सर्वात शेवटी श्री चापे सरांच्या कार्यकाळातील काही प्रासंगिक घटनांची रंगीत छायाचित्रे आहेत. मलपृष्ठावर प्राचार्य एन.बी.चापे यांच्या कार्यकर्तृवाच्या अनुषंगाने येणारा प्रा.डॉ.संजय गायकवाड यांच्या लेखातील विशेष निवडक भाग ग्रंथाची पाठराखण म्हणून घेतला आहे, तो अत्यंत सूचक आहे. पद्मपाणि प्रकाशनाच्या मालक, प्रकाशिका सौ.चंद्रकला वाठोरे यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथाचे मुखपृष्ठ चित्रकार प्रा.भीमराव वाठोरे यांचे असून श्री दत्ता वायाळ आणि सौ.अंजु विष्णू राठोड यांनी सुंदर अक्षरजुळवणी केली आहे. तसेच डिस्प्ले ग्रफिक्स"ने सुद्धा आकर्षक छपाई केली आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या संपादनासाठी प्रा.शिवाजी वाठोरे यांना प्रा.विजय पांडे, प्र.म.धोडपकर, डी.एन. जाधव, कृष्णा कडुबा लहाने यांचे सहाय्य लाभले आहे. प्राचार्य एन.बी. चापे सरांच्या गौरवग्रंथ प्रकाशनास व सत्कार सोहळ्यास मंगलमय शुभेच्छा..!

**आधारवड : प्राचार्य-एन.बी.चापे**
**संपादन : प्रा.शिवाजी वाठोरे**
**प्रकाशन : पद्मपाणि प्रकाशन, सिल्लोड, प्रथमावृत्ती : जाने.- २०२४**
**स्वागत मूल्य : २६०**

# अंधारलेल्या डोळ्यात लाल दिव्याचं स्वप्न !

आधुनिक केसरी



शेवगाव तालुक्यातील ठाकूर निमगाव येथील विष्णू पाटील कातकडे यांचे वारकरी परंपरा असलेलं सामूहिक कुटुंब. याच घरातील कु.जयश्री कातकडे हिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचं तालुक्यात तसेच स्थानिक माध्यमातून कौतुक होत आहे. कारण नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परीक्षेत सिव्हील इंजिनिअर असलेल्या जयश्री हिची ज्युनियर इंजिनियर या वर्ग-2 च्या पदावर निवड झाली आहे.

जयश्रीच्या यशाचा हा प्रवास अतिशय खडतर ठरला आहे. जो ग्रामीण भागातील अनेक मुलामुलींना प्रेरणादायी ठरणार आहे. ठाकूर निमगाव येथील प्राथमिक शाळेत शिक्षण पूर्ण केल्यानंतर जयश्री शेवगाव येथील रेसिडेन्शिअल हायस्कूल येथे पुढील शिक्षणासाठी दाखल झाली. इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण तिने इथेच पूर्ण केले. त्यानंतर न्यू आर्ट्स कॉलेज शेवगाव येथे विज्ञान शाखेतून ती इयत्ता बारावी उत्तीर्ण झाली. इयत्ता बारावी नंतर प्रत्येक विद्यार्थ्याला पडतो तसाच प्रश्न जयश्रीला देखील पडला होता. बारावीनंतर पुढे काय करावे ? यावर तिला अनेकांनी अनेक सल्ले दिले. शेवटी मात्र जयश्रीने कर्जत तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंगसाठी प्रवेश घेतला आणि 2019 साली तिने आपली सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली. पदवीचे शिक्षणं सुरू असतानाच इतर मुलामुलींप्रमाणे, आपणही प्रशासनात जावं, आईवडिलांची मान अभिमानाने उंच करावी, हे स्वप्न जयश्रीने उराशी बाळगलं होतं. त्यासाठी तिला कुटुंबातूनही मोठा आधार मिळत गेला. इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त झाल्यानंतर आपली बहीण राजश्री हिच्या सोबत ती थेट पुणे येथे अभ्यासासाठी गेली. पुण्यात आल्यावर MPSC व्दारे घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र इंजिनिअरिंग सर्विसच्या परीक्षेत जयश्रीची मुख्य परीक्षेसाठी पात्र होण्याची संधी फक्त अर्धा मार्क्सने हुकली. हा पहिला घाव तिला अतिशय त्रासदायक असाच ठरला होता. परंतु खचून न जाता मोठ्या हिमतीने तिने पुन्हा सुरुवात केली. परंतु पुढे 2020 सालाच्या शेवटी आलेल्या कोरोना महामारीने जयश्रीच्या आयुष्याला एक वेगळी दिशा मिळाली. वडील स्व.श्री.रमेश दादा कातकडे आणि चुलते स्व. रामेश्वर साहेब कातकडे या दोघांचे मे 2021 मध्ये कोरोना आजाराने निधन झाले. जयश्री आणि इतर संपूर्ण कुटुंबासाठी हा तीव्र धक्का होता. ज्यांच्या अभिमानासाठी अधिकारी होण्याचं स्वप्न उराशी बाळगलं होतं, ते चेहरेच काळाआड गेले होते. संपूर्ण कुटुंब पूर्णतः ढासळून गेलं होतं. डोळ्यात साचलेलं स्वप्न पूर्ण करून स्वतःसोबत संपूर्ण कुटुंबाचं आयुष्य प्रकाशमान करण्याचे स्वप्न बघणाऱ्या जयश्रीच्या आयुष्यात या प्रसंगामुळे अचानक काळाकुट्ट अंधार साचला होता. एवढ्याशा वयात कुटुंबावर ढासळलेला हा दुःखाचा डोंगर सहन करत कुटुंबासाठी आधार बनण्याव्यतिरिक्त जयश्री आणि तिच्या भावंडांकडे इतर दुसरा कोणताही मार्ग नव्हता. काही महिने कुटुंबासोबत राहिल्यानंतर जयश्रीला पुन्हा तिचे स्वप्न खुणावू लागले. आपण कधीतरी अधिकारी होऊ वडील आणि चुलते यांचं स्वप्न पूर्ण करू आणि अधिकारी होऊन त्यांच्यापुढे उभा राहिल्यावर त्याच्या चेहऱ्यावरील समाधान पाहू. तेव्हा जीवन सार्थकी लागल्याची भावना मनात येईल. अशी तिची दृढ इच्छाशक्ती अजूनही कायम होती. म्हणूनच जयश्रीने मोठ्या हिमतीने त्यांच्यासाठीच पुन्हा एकदा स्वप्नांच्या दिशेने वाटचाल सुरू केली. काहीकाळ कुटुंबासोबत राहिल्यानंतर ती अभ्यासासाठी शिरूर या ठिकाणी गेली. मैत्रीण कीर्ती साळवे हिच्यासोबत तिने संजीवनी पॉलिटेक्निक कॉलेज या ठिकाणी शिक्षिका म्हणून दोन वर्ष नोकरी देखील केली. नोकरी करत असताना आपल्या स्वप्नांकडे मात्र कधीही तिने दुर्लक्ष होऊ दिलं नाही. एक मुलगी म्हणून असलेली सामाजिक बंधनं, कुटुंबाचा एक आधार आणि वडील आणि चुलते यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी या सर्व पातळीवर जयश्री लढत होती. स्वतःला सिद्ध करत होती. वेगवेगळ्या परीक्षा देत होती. पण निकाल मात्र मनासारखा येत नसायचा. एकीकडे कुटुंबाचे दुःख तर दुसरीकडे स्वप्नांची रेलचेल या सगळ्यात डोळ्यांच्या कडा पाणावून जायच्या. परंतु डबडबलेल्या या डोळ्यातून लाल दिव्याच्या स्वप्न मात्र जयश्रीने कधी वाहून जाऊ दिलं नाही. नोकरी करताना खूप वेळ जात असल्याने MPSC सह अनेक परीक्षांमध्ये तिला अपयश येत होतं. अतिशय कमी मार्कांने तिचं अधिकारी होण्याच स्वप्न अनेकदा तिला हुलकावणी देत होत. परंतु तिने कधी हार मानली नाही. कारण तिचे प्रयत्न तिला स्वस्त बसू देत नसायचे. तिने आपल्या मनाला कधी निराश होऊ दिले नाही.

आपले वडील आणि आपले चुलते यांच्यासाठी तिला अधिकारी व्हायचचं होतं. भूतकाळाचे सर्व साखळदंड तोडून ती पुन्हा पुन्हा नव्याने गरुड भरारी घेण्यास सिद्ध होत असे. कोलमडलेल्या मनाला पुन्हा हुरूप देत असे. दरम्यानच्या काळात राज्य सरकारने हजारो नोकऱ्यांची घोषणा केली होती. आणि नेमकी याच वेळी अभ्यासाला पूर्ण वेळ मिळत नसल्याने तिने आपल्या नोकरीला रामराम ठोकला. आणि आपले पूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले. शिरूर या ठिकाणी असलेल्या ज्ञानसागर अभ्यासिकेत तिने आपला अभ्यास आणखी जोमाने सुरू केला.

अभ्यास करत असताना प्रत्येक मुलीच्या आयुष्यात येणाऱ्या सर्वच अडचणी जयश्रीच्या देखील स्वप्नपूर्तीचा मार्गावर अनेक वेळा तिला अडथळा म्हणून डोकं वर काढायच्या. परंतु जयश्रीची थोरली बहीण वर्षा पवार आणि दाजी श्री.महादेव पवार हे दोघे अगदी आई वडिलांच्या नात्याने अन् मैत्रीच्या भावनेने तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. सोबतच कुटुंब आणि इतर नातेवाईक देखील तिला पाठिंबा देत असत. जयश्रीने देखील या सर्वांना कधीच निराश केले नाही. ती हळूहळू आपल्या ध्येयाच्या दिशेने मार्गक्रमण करतच होती. दरम्यानच्या काळात तिचा सहायक नगररचनाकार पदाचा निकाल अवघ्या 2 मार्क्सने हुकला. निराशा पुन्हा तिच्या भोवती गराडा घालू पाहत होती, परंतु कीर्ती साळवे , आरती आल्हाट, अश्विनी शिर्के आणि रुपाली या तिच्या MPSC चा अभ्यास करणाऱ्या मैत्रिणींनी तिला मोठा धीर दिला. अपयश पचवणे नक्कीच सोपे नसते, पण जयश्रीने त्यावरही मात करून पुन्हा पुढचा प्रवास वेगाने सुरू केला. लवकरच राज्य शासनाने जलसंधारण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, वेगवेगळ्या जिल्हा परिषद मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी साठीची मोठी भरती जाहीर केली. जयश्रीसाठी ही अतिशय आनंदाची गोष्ट होती. WHATSAPP, INSTGRAM, FACEBOOK यांसारख्या समाजमाध्यामांचा देखील तिने तत्काळ निरोप घेतला. दिवसभर मोबाईल देखील बंद असायचा. फक्त अभ्यास हीच एकमेव गोष्ट तिच्या आयुष्यात उरली होती. याच अभ्यासाच्या जोरावर सर्व विभागाचे पेपर तिने अतिशय उत्तम पद्धतीने नियोजन करून आणि आत्मविश्वासाने दिले. तरीही निकालाची चिंता मात्र तिला सतावत होती. वेगवेगळ्या विभागाचे निकाल लागत होते. मुलं अधिकारी होत होते, रोजच कुठेतरी गुलाल उधळत होता. जयश्रीच्या मनाला ते चित्र पाहून आनंदाचे उधाण यायचे. अंगाला हळद लागण्यापूर्वी यशाचा गुलाल उधळण्याचं तिचं स्वप्न होतं. 8 फेब्रुवारी हा दिवस उजाडला. सगळीकडे चर्चा होती, की आज निकाल लागणार. तसे जयश्रीसोबत सर्व कुटुंब, मित्र परिवार, जयश्रीच्या वाईट काळात तिला साथ देणारे जिवाभावाचे माणसं सर्वांनाचीच उत्सुकता शिगेला पोहोचली होती. दुपारी 4 वाजता निकाल लागला. कु.जयश्री सुमन रमेश कातकडे अधिकारी झाली होती. क्लास 2 चे पद मिळवले होते. आनंद गगनात मावत नव्हता. आजपर्यंत केलेला सगळा संघर्ष क्षणात डोळ्यापुढे येऊन गेला. जयश्रीच्या चेहऱ्यावर जणूकाही सुखदुःखांच्या आश्रुंचा सोहळा सजला होता.जयश्रीने पहिला फोन आई ( सुमन ) आणि मैत्रिणीसारखी जीव लावणारी चुलती ( उर्मिला ) यांना केला. दुपारच्या उन्हात शेतात काम करणाऱ्या या दोघींचा आनंद जणूकाही संपूर्ण शिवारानेच साजरा केला. सगळं आयुष्य एका क्षणात बदलून गेल्याची भावना सगळ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. 10 फेब्रुवारीला सायंकाळी 6 वाजता जयश्री तिच्या गावात ( ठाकूर निमगाव येथे) आली. तेव्हा भाऊ गणेश, नरेंद्र आणि बहीण हर्षदा, ऋतुजा यांनी फटाक्यांच्या आतिषबाजीने आपल्या लाडक्या बहिणीचे एखाद्या विजयीवीराप्रमाणे जल्लोषात स्वागत केलं. ढोल ताशांच्या गजरात गावकऱ्यांनी गावभर तिची मिरवणूक काढली. तिची वहिनी वंदनाताई यांनी तिचे आनंदाश्रूने औक्षण केलं. आजी-आजोबांचा आशीर्वाद घेऊन मिरवणूक थेट गावातील मंदिराकडे गेली. जवळपास सगळा गाव जयश्रीच्या स्वागतासाठी हजर होता. गावातील वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींनी तिचा सत्कार केला. जयश्रीने तिच्या छोट्याशा मनोगतात तिला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष साथ देणाऱ्या सर्वांचेच आभार मानले. 4 वर्षापूर्वी वडील आणि चुलते यांच्यासाठी पाहिलेलं स्वप्न पूर्ण केल्याचा आनंद तर आहेच, पण ज्यांच्यासाठी हे सर्व केलं, ती लोकं आज नसल्याचं दुःख देखील असल्याची खंत तिने व्यक्त केली. जयश्रीच्या संघर्षाची कहाणी ऐकताना सर्वांचे डोळे पाणावले होते. तिच्या या यशाने गावातील तरुण तरुणींना देखील आता एक नवा हुरूप आला आहे. जयश्री सांगते की, कुटुंब, नातेवाईक, मित्र परिवार, शिक्षक आणि काही जिवाभावाची माणसं सोबत असतील, तर कोणतीच गोष्ट अशक्य नसते. नुकत्याच जलसंधारण खात्याचा निकाल लागला, त्यातदेखील जयश्रीची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदासाठी निवड झाली. आणखी अनेक परीक्षांचा निकाल बाकी आहे, प्रामाणिकपणे केलेल्या अभ्यासामुळे इतर अनेक ठिकाणी माझी निवड होईल, असे जयश्री आत्मविश्वासाने सांगते. जयश्रीच्या आयुष्यातील एका ज्वलंत अन् संघर्षमय युगाचा अंत झाला आहे. तिच्या या यशाने अनेकांचा जीव सुखावला आहे. जयश्रीचा हा प्रवास तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे. यापुढे देखील माझा अभ्यास मी सुरूच ठेवणार आहे, असे जयश्रीने सांगितले.

रामेश्वर सुमन भाऊसाहेब काटे
ठाकूर निमगाव, ता. शेवगाव
8888726369

# सामूहिकतेचे वातावरण निर्माण करणे हाच भजन महोत्सवाचा उद्देश : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** दरवर्षीप्रमाणे यंदा सुध्दा आपण भजन महोत्सव आयोजित केला आहे. दोन दिवस येथे टाळ, मृदंग वाद्यांच्या साथीत ईश्वराचे गुणवर्णन व नामस्मरण केल्या जाणार आहे. यातून धार्मिकता, सांस्कृतिक आणि सामूहिकतेचे वातावरण निर्माण होणार असुन हाच या आयोजना मागचा उद्देश असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर यांनी केले आहे.

यंग चांदा बिग्रेडच्या वतीने अंचलेश्वर मंदिर येथे आयोजित विविध भाषीय दोन दिवसीय भजन महोत्सवाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला श्री महाकाली माता महोत्सव समीतीचे सचिव अजय जयस्वाल, विश्वस्त सूर्यकांत खणके, गुरुदेव सेवा समितीचे ग्रामगितचार्य दादाजी नंदनवार, तालुका प्रचार प्रमूख धनराज चौधरी, गुणवंत चंदनखेडे, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, ग्रामीण शहर संघटक मुन्ना जोगी, सविता दंढारे, आशा देशमुख, चंद्रशेखर देशमूख, अस्मिता दोनारकर, सरोज चांदेकर, निलिमा वनकर, वंदना हजारे, गोपी मित्रा, सतनाम सिंह मिर्धा, हेरमन जोसेफ, कार्तिक बोरेवार, विनोद अनंतवार, किशोर बोलमवार, करण नायर, देवा कुंटा, प्रविण कुलटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, यंदा या भजन महोत्सवाचे तिसरे वर्ष आहे. विविध भाषीय भजन मंडळांना एक मोठे व्यासपीठ आपण या महोत्सवाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देत आहोत. मतदार संघात विविध विकासकामे होत असतांना असे आयोजनही आवश्यक आहे. भजन मंडळाना एकत्रित आणण्याचे कामही या महोत्सवाच्या माध्यमातून होत आहे. प्रत्येक सामाजिक कार्यक्रमात भजन मंडळांचे योगदान आम्हाला लाभले आहे. श्री माता महाकाली महोत्सवातही भजन मंडळे नेहमी सक्रियरित्या समोर आली आहेत. मनाची एकाग्रता, शब्द, अर्थ, विचार, संगीत - स्वर, ताल, लय, वाद्य, टाळ या सर्वांचे एकत्रीकरण म्हणजे भजन, भजनातून परमेश्वराच्या दिव्यशक्तीचे गुणगान, दिव्यशक्तीचे चिंतन, एकाग्रता,आत्मोन्नती, होकारात्मक विचार, मनाचे आरोग्य, बुद्धिचा विकास होते. यातून आपले दुःख विसरुन सकारात्मकता निर्माण होते असे ते यावेळी म्हणले.

यंग चांदा ब्रिगेडच्या माध्यमातुन आपण अनेक सामाजिक कार्यक्रम आयोजित करत आलो आहे. आता भजन महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक क्षेत्रातही ही संघटना आपले योगदान देत असल्याचे समधान आहे. श्री माता महाकाली महोत्सवा नंतर विविध भाषीय भजन महोत्सवही चंद्रपूरची एक परंपरा बनणार आहे. आणि भजन मंडळांच्या सक्रिय सहभागातून हा महोत्सव भव्य होत चालला असल्याचे ते यावेळी म्हणाले. सदर भजन महोत्सवात मराठी, तेलगु, बंगाली, हिंदी, गुजराती, पंजाबी, छत्तीसगडी, गोंडी, मारवाडी यासह अनेक भाषीय 200 हुन अधिक भजन मंडळांनी सहभाग घेतला आहे.

# नाशिक जिल्ह्यात कांदा रथयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** केंद्र सरकारचे कांदा निर्यात धोरणाविषयीचे धरसोड धोरण, कांद्याचे घसरणारे दर, अनेकवेळा आंदोलन करुनही शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे होणारे दुर्लक्ष, या पार्श्वभूमिवर जिल्ह्यातील कांदा उत्पादक लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन केंद्रातील भाजप सरकारविरोधात एकवटू लागल्याचे चित्र आहे. भाजपच्या शेतकरी विरोधी धोरणाविषयी जनजागृतीसाठी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विशेषतः कळवण, देवळा, सटाणा, मालेगाव (कसमादे) या भागात शेतकऱ्यांनीच तयार केलेला कांदा रथ फिरत असल्याने भाजपची डोकेदुखी वाढणार आहे. कांदा उत्पादकांना काहीसा फायदा होऊ लागताच भाजप सरकारकडून निर्यातबंदी केली जात असल्याचा अनुभव वारंवार येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादकांचा रोष परवडणारा नसल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने निर्यातबंदी उठवली असली तरी ती पूर्णतः खुली केलेली नाही. त्यातही अनेक अटी-शर्ती आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष कायम आहे. काही दिवसांपूर्वी चांदवड येथे कांदा उत्पादकांनी केलेल्या रास्ता रोको आंदोलनात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनीही सहभाग घेतला होता. पुढील आठवड्यात शरद पवार हे पुन्हा जिल्ह्यात येत असून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. भाजप सरकारकडून शेतकऱ्यांवर कशा प्रकारे अन्याय केला जात आहे, हे पटवून देण्यासाठी व्यंगचित्रकार किरण मोरे आणि बागलाण तालुका शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष केशव सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून कांदा रथ तयार झाला. कळवण, सटाणा, मालेगाव आणि देवळा तालुक्यातील अनेक गावांमध्ये ही यात्रा गेली आहे. केंद्र सरकारने केलेल्या कामांची माहिती देण्यासाठी ग्रामीण भागात संकल्प रथयात्रा सुरु केली होती. या रथयात्रेला जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये विरोध झाला होता.



# क्रीडा स्पर्धेत यादववाडी शाळेचे उत्तुंग यश

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षण विभाग आयोजित जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हा स्तरावरील क्रीडा स्पर्धा त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल, नेवासा फाटा येथे उत्साहात पार पडली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळा स्तरापासून ते जिल्हा स्तरापर्यंत चार वर्षांनंतर क्रीडा व्यासपीठ उपलब्ध झाले. मा. शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले अतिशय सुंदर आणि नेटके नियोजन हे या स्पर्धेचे वैशिष्ट्ये ठरले. इयत्ता पहिली ते पाचवी (लहान गट) खो खो क्रीडा प्रकारांत तालुक्यातून प्रथम आलेल्या शाळांनी सहभाग घेतला. अहमदनगर जिल्ह्यातील उपक्रमशील शाळा म्हणून लौकिक असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-यादववाडी शाळेच्या खेळाडूंनी शाळेच्या लौकिकाला साजेशी कामगिरी करीत खो खो या सांघिक क्रीडा प्रकारात सर्वाधिक यश खेचून आणले. यादववाडी शाळेकडून शुभम यादव, स्वराज आडोळे, कौस्तुभ नाट, विराज यादव,प्रणव यादव, पृथ्वीराज आडोळे, हार्दिक यादव, सुरज गिरे, शंभूराज यादव, अथर्व कोल्हे, करण भोसले, आर्यन ठोंबरे, श्लोक यादव यांनी उत्कृष्ट खेळ केला. जिल्हापातळीवर खो खो खेळामध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यपिका श्रीम झावरे मॅडम, शिक्षक श्री चहाळ सर,यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षणाधिकारी मा. भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी राणे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी विनेश लाळगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण यादव, केंद्र प्रमुख चांगदेव गवळी,सरपंच राजेंद्र शेळके मा.सरपंच अरविंद यादव व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# महाशिवरात्रीनिमित्त गणेश मंदिरात श्रमदान

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील शिवाजी नगरातील अष्टविनायक गणेश मंदिरात आज महाशिवरात्री दिनी ज्येष्ठ नागरिकाकडून मंदिराची साफसफाई करून श्रमदान करण्यात आले.

आज घडीला शहर व ग्रामीण भागातील अनेक महिला पुरुष वेगवेगळ्या तीर्थक्षेत्री जाऊन पंधरा दिवस ते एक महिना सेवा करत आहेत, अशी सेवा करणे ज्येष्ठ नागरिकांना शक्य नाही म्हणून महाशिवरात्रीचे औचित्य साधून, या नगरातील श्री निवृत्ती गीते, प्रकाश ससे, सोनाजी घुगे, तुकाराम ननेर, हरीनारायण घुगे आदींनी अष्टविनायक गणेश मंदिरात भल्या पहाटेच साफसफाई करून मंदिर धुवून काढले, यात के.सी. घुगे, रामकिशन आघाव यांनी देखील सहभाग नोंदविला.

जेष्ठ नागरिकाच्या ह्या उपक्रमाचे व सेवेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. हे मंदिर वीस वर्षापूर्वी लोकवर्गणीतून बांधले असून, ते भाविकांचे श्रद्धास्थान आहे,शहर व परिसरातील भाविक दर चतुर्थीला मोठ्या भक्तिभावाने येथे येत असतात, मंदिरात वर्षेभर विविध उपक्रम राबविले जातात.



# अ.भा. कुणबी मराठा महासंघाच्या तालुकाध्यक्षपदी नीलिमा वाबळे

## शहराध्यक्षपदी जयश्री शिंदे

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे उत्तरनगर जिल्हा अध्यक्ष अनिल पाटील ताके यांनी नेवासा शहरातील मराठा समाजातील क्रियाशील महिलाचा सन्मान करून अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाच्या नेवासा तालुका महिला आघाडीच्या अध्यक्षपदी निलिमाताई अशोक वाबळे यांची तसेच शहराध्यक्षपदी सौ. जयश्री चंद्रकांत शिंदे.यांची नियुक्ती जाहीर केली आहे.

यावेळी पुढीलप्रमाणे तालुका व शहरातील महिला पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. सौ. नीलम डौले, तालुका कार्याधक्षा, सौ. निता वाघ, शहर कार्याध्यक्षा, डॉ. मानसी वाघ, तालुका संघटक सचिव, ॲड. सौ.सुरेखा टेमक, शहर संघटक सचिव, सौ.छाया कानडे, शहर सचिव, सौ. राजश्री पाटील, उपाध्यक्ष, सौ. मनीषा टेमक, सौ. शर्मिला शिंदे, उपाध्यक्ष, सौ. उज्ज्वला गवळी, उपाध्यक्ष, श्रीमती, दीपाली पवार, सर्कल प्रमुख. सौ. उषा मारकळी, उप सर्कलप्रमुख ॲड. उत्कर्ष मोटे, कायदेशीर सल्लागार सौ. भारती करडक, शहर प्रसिद्धी प्रमुख श्रीमती, लिलाताई मारकळी, शहर संपर्क प्रमुख सौ.रुपाली शेजूळ, सदस्य.

नूतन सर्व पदाधिकाऱ्यांना रविवार. दि.१० मार्च रोजी दुपारी १२ वाजता नेवासा शहरातील हॉटेल प्रणाम येथे महासंघाचे सस्थापक अध्यक्ष प्रल्हाद गुलभिले जी.के. गाडेकर,संस्थापक सचिव सतीश पवार कार्यध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र प्रमुख दिलीप पोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत तर उत्तर नगर अध्यक्ष अनिल ताके व महिला जिल्हा अध्यक्षा सौ निता हासे यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती पत्र देणार असल्याची माहिती नूतन महिला तालुका अध्यक्षा सौ. नीलिमाताई वाबळे व शहराध्यक्षा सौ. जयश्रीताई शिंदे यांनी दिली आहे.

# प्रियंका बानकर ठरल्या पैठणीच्या मानकरी

आधुनिक केसरी न्यूज



**सोनई :** जागतिक महिला दिनानिमित्त शनिशिंगणापूर येथील लोटस इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये महिला भगिनींसाठी आयोजित होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

सरपंच पुष्पाताई बानकर, शनेश्वर देवस्थानच्या माजी अध्यक्ष अनिता शेटे, विश्वस्त सुनिता आढाव, प्राचार्य डॉ.मंगल बानकर आदींच्या हस्ते कार्यक्रमा प्रारंभी दीप प्रज्वलन करण्यात आले.

लोटस इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य डॉ.मंगल रावसाहेब बानकर यांनी प्रास्ताविक करत महिलांचे स्वागत केले. प्रसिद्ध निवेदक, पत्रकार गणेश हापसे यांनी दिमागदार शैलीत विविध खेळाचे सादरीकरण केले.दरम्यान महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक खेळ,गाणी,उखाणे,प्रश्नमंजुषा आदी स्पर्धा घेण्यात आली.यामध्ये तळ्यात मळ्यात,बॉटल्स बॅलन्स,फुगा फोडणे, विविध गाण्यावर नृत्य, संगीत खुर्ची आदीसह विविध मनोरंजनात्मक खेळ खेळण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.तीन तास आयोजित कार्यक्रमात महिलांनी मनसोक्त आनंद लुटला. सौ.प्रियंका विशाल बानकर यांनी प्रथम क्रमांक मिळवून मानाची पैठणी जिंकली. विविध खेळात सहभागी प्रथम तीन क्रमांक मिळवणाऱ्या महिलांचा बक्षिस देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास महिलांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल व कार्यक्रमाचे उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल सुप्रसिद्ध निवेदक पत्रकार ,गणेश हापसे (भाऊजी) यांचे आभार मानले.पुढच्या वर्षी आणखी मोठ्या प्रमाणात महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. असे त्यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लोटस इंग्लिश मिडीयम स्कूलमधील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# एमआयएम पक्षाचे आमदार हिंदू विरोधी : सतीश महाले

## दिशादर्शक फलकावर छत्रपती संभाजीनगर नाव नाही

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आ. फारुक शहा यांनी महामार्ग नजीक लावलेल्या दिशा फलकावर छत्रपती संभाजी नगर उल्लेख नसून दौलताबाद असल्याने शिंदे गटाचे धुळे जिल्हा प्रमुख सतीश महाले त्यांच्या कार्यकर्त्या सह त्या ठिकाणी फलकावरील दौलताबाद नावाच्या जागी संभाजीनगर अशी नावाची पट्टी चिटकवण्यात आली व आमदारांचा निषेध करण्यात आला.

गेल्या काही दिवसापूर्वी धुळे शहरातील आमदार फारुक शाह यांच्या हस्ते आमदार निधीतून महामार्ग नजीक दिशादर्शक फलक लावण्यात आला होता त्या दिशादर्शक फलकात जिल्ह्यातील लोकल गावांची नावे देखील समावेश करण्यात आली परंतु त्यात एक महत्त्वाचा मार्ग म्हणून छत्रपती संभाजी नगर असे त्या फलकावर नाव न घेता दौलताबाद असा उल्लेख करण्यात आला होता या विषयासंदर्भात धुळे शहरात मोठ्या प्रमाणावर राजकीय चर्चा सुरू होती त्याचप्रमाणे शिंदे गटाचे धुळे जिल्हाप्रमुख सतीश महाले यांनी त्या फलकाची दखल घेऊन कार्यकर्त्यांसोबत क्रेनच्या साह्याने त्या फलकावरील दौलताबाद नावावर छत्रपती संभाजी नगर अशा नावाची पट्टी चिटकवण्यात आली. त्या ठिकाणी सतीश महाले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की इतक्या मोठ्या फलकावर गरताड सारख्या छोट्या गावाचे नाव टाकण्यात येथे परंतु शासनाचे परिपत्रक असल्यावर देखील आमदारांनी त्या ठिकाणी नाव सुचवले नाही छत्रपती संभाजी राजे यांच्या नावाची ओळख म्हणून संभाजीनगर हे नाव आमदाराला सहन होत नाही असा आरोप सतीश महाले यांनी केला. महाशिवरात्रीच्या अशा




पावन दिवसानिमित्त हे नाव आमच्या हिंदू बांधवांच्या डोळ्यात खटकत होते म्हणून वेळात दौडले वीर मराठी साथ अशा ह्या सात मराठ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आम्ही निवडक मावळे या ठिकाणी दिशा फलकावर योग्य नाव टाकण्यासाठी हजर झालो आणि ते काम आम्ही पूर्ण केले असे या ठिकाणी जिल्हाप्रमुख सतीश महाले यांनी सांगितले. या ठिकाणी उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख सतीश तात्या महाले, राजू चौधरी,पंकज चौधरी, अनुप महाले, सूर्यकांत महाले, धीरज मोकळे,प्रसाद महाले,सचिन महाले,पंकज नगराळे, आशिष चौधरी,जयेश नरवाडे, जयेश शिंगाने,विकी महेंदळे,विश्वजीत चौगुले, पवन जाधव, केतन जाधव,मनोज नरवाडे,सिद्धार्थ विराट, ऋतिक राजपूत, प्रसाद रघुवंशी, संदीप पाटील,धीरज काळे, निखिल मराठे, विष्णू साळे आदी उपस्थित होते.



# एम.आय.टी.त स्नेहसम्मेलन उत्साहात

## यशाला कोणताच शॉर्टकट नसतो : डॉ. राजीव डोंगरे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील एम.आय. टी.पॉलिटेक्निक रोटेगाव येथे वार्षिक स्नेह-संमेलन 'क्षितिज-2के24' मोठ्या उत्साहात साजरे झाले. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून वैजापूर येथील आरोहण अकॅडमिचे अध्यक्ष व डोंगरे मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. राजीव डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना यशासाठी जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनत करण्याचा सल्ला दिला. कारण यशाला कोणताच शॉर्टकट नसतो असे सांगितले. कोणत्याही कामाची लाज वाटू देऊ नका, अनुभव मिळावा आणि यशस्वी व्हा, असा यशाचा मूलमंत्र असल्याचे सांगितले. आपण ग्रामीण भागातील आहोत, हा न्यूनगंड सोडून द्या. सर्वांना समान संधी उपलब्ध असतात. एकदा मिळालेली संधी पुन्हा मिळत नसते, असेही ते म्हणाले. आपल्या ग्रामीण भागात सर्पदंशाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण जास्त असल्याने त्यावर त्यांनी चिकित्सक अभ्यास केला असल्याचे सांगून अनेकांना यातून वाचविल्याचे समाधान मिळाल्याचेही ते म्हणाले.

याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य श्री.पंकजभाऊ ठोंबरे, रोटेगावचे सरपंच श्री.बळवंत शिंदे, अघुरचे सरपंच श्री.वसंत पाटील मतसागर, पंचायत समिती सदस्य श्री.सुरेश राऊत, रोटेगावचे माजी उप-सरपंच श्री.प्रेमसिंग राजपूत व श्री.काकासाहेब मतसागर तसेच संस्थेचे प्राचार्य प्रा. किशोर पाटील सर, प्रा. एन.आर.सोनावणे, प्रा.डी.पी. आव्हाळे, समन्वयक प्रा.व्ही.जी.तळेकर, सर्व विभाग प्रमुख आणि विद्यार्थी संसदेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यानंतर विद्यार्थ्यांसाठी नृत्य, गायन, द्वंद्वगीत, शेला-पागोटा, अंताक्षरी स्पर्धा, नकला, वन-मिनिट शो तसेच क्रीडा प्रकारात व्हॉलीबॉल, कॅरम, चेस इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर ट्रॅडिशनल-डे, मिसमॅच-डे, टाय-डे, साडी-डे यासारखे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते.

यावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये कु.महिका राजस, कु.पूनम शिहरे, कु.योगिता सोळस, कु.स्वीटी जाधव, कु.प्राची, कु.पल्लवी, सागर चव्हाण, कु.वैष्णवी चव्हाण, रोहित बनकर, सोहम साबळे, कु.जान्हवी कदम, कु.आकांक्षा, कु.पायल पाटील, निलेश भवर, शिवराज शेळके आणि पवन काथार या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.नेहा चव्हाण व कु.सिध्दी बोथे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विद्यार्थी संसदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. वाय. ए. कवडे व महासंचालक प्रा. मुनिषजी शर्मा यांनी सर्व विद्यार्थी, सर्व प्राध्यापक वृंद, कर्मच्यारी यांना शुभेच्छा दिल्या.

# आर्य चाणक्यचे स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथे महाराष्ट्राची लोकधारा व सांस्कृतिक विचारांवर आधारित स्नेहसंमेलन संपन्न झाले. दोन दिवसाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटक जलदूत किशोर शितोळे (अध्यक्ष, देवगिरी नागरी सहकारी बँक), डॉ. पद्मकुमार कासलीवाल (अध्यक्ष,स्था. व्य. स.,पैठण )यांच्या हस्ते संपन्न झाला. जुगलकिशोर लोहिया (कार्यवाह, स्था.व्य.स.,पैठण), विजयराव चाटूपळे(सदस्य, भा. शि. प्र.,अंबाजोगाई), शिवाजी मारवाडी(अध्यक्ष, शा.स.प्रा.) नंदकिशोर मालाणी(अध्यक्ष, शा.स.मा.), भास्कर कुलकर्णी (मुख्याध्यापक प्राथमिक), ज्योती जोशी( मुख्याध्यापिका माध्यमिक) यांच्या शुभहस्ते भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात अतिशय जल्लोषात करण्यात आली. वीस बाय तीस च्या स्क्रीनवर रिमोटच्या साह्याने व फटाक्यांच्या आतषबाजी, रंगीत रोषणाईमध्ये भव्य असा शुभारंभ करण्यात आला. या स्नेहसंमेलनाचा विषय छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक साडेतीनशेव्या वर्षाचे ते औचित्य समोर ठेवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास सांगणारे गीत व नाट्य सादर करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्राची लोकधारा,श्रीरामाचे भक्ती गीत,जोगवा, कोळी नृत्य आदिवासी नृत्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, देशभक्तीपर गीत,शिवाजी महाराजांची आरती असे प्रत्येक वर्ग तुकडीस एक गीत देत अशा 29 सांस्कृतिक गीतांचे सादरीकरण करण्यात आले. सूत्रसंचालन बालकलाकारांनी छोटेखानी नाटीकेच्या माध्यमातून चि. साईराज धोकटे, रुद्राणी पानगे, आरुष कुलकर्णी, विश्वदीप भडके, अश्विनी सोनवणे, अथर्व जोशी, भक्ती थोरात,समृद्धी भिंगारे, ज्ञानदा देव, स्वरा गायकवाड, सिद्धी जाधव, समर्थ वाघमारे आदींनी केले. या शुभप्रसंगी सदस्य किशोर भाकरे, ॲड.राजेंद्र गोर्डे,रेणुकादास गर्गे,रामकृष्ण जमादार,अनिल कावसानकर, अशोक शेवतेकर, शंकर सपकाळ आणि देवेश इनामदार, अतिश गायकवाड,सुभाष शिंदे,संतोष गव्हाणे,रामनाथ केकान, सुभाष नवथर, कपिल पहिलवान, राजेंद्र जिवडे आदी मान्यवर उपस्थिती होते. या कार्यक्रम प्रसंगी हजारोच्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते. भव्य दिव्य अशा दोन दिवसीय स्नेहसंमेलन मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात स्नेहसंमेलन प्रमुख सर्फराज अंबेकर, सहप्रमुख विकास देशमुख,सुदाम पोल्हारे, आशिष होट्टे,शुभांगी सदावर्ते, प्रियंका निकाळजे, सतीश आहेर समवेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे मुख्य सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विलास खर्डेकर व राखी धोकटे यांनी केले.



# खा. श्रीनिवास पाटील यांचा निधीतून लोणी येथे बंदिस्त गटारकामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीनिवास पाटील यांच्या खासदार निधीतून आणि सारंग पाटील यांच्या विशेष सहकार्यातुन लोणी ता.खंडाळा येथे बंदिस्त गटर या कामासाठी निधी उपलब्ध झालेला असून या गटर कामाचे भूमिपूजन कार्यक्रम संपन्न करण्यात आला.या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाचे नेते डॉ.नितीन सावंत,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाच्या खंडाळा तालुकाध्यक्षा आशाताई भोसले,खंडाळा तालुकाध्यक्ष अभिजित चव्हाण,उपाध्यक्ष ओम कदम, लोणीचे तंटामुक्ती अध्यक्ष अमित कदम, भोळीचे तंटामुक्ती अध्यक्ष विशाल चव्हाण, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे खंडाळा तालुका प्रमुख सागर कदम, बाळकृष्ण कदम, युवा सेना तालुका अधिकारी मयूर कारळे, आकाश कारळे, ग्रामपंचायत सदस्य कल्पना वळकुंदे, ग्रामपंचायत सदस्य जयश्री भोसले, संचालक धर्माजी कदम, गुलाब मोरे,



संतोषी कदम, पोलीस पाटील मोहिनी लोंढे, उत्तम कदम, हवालदार सुनील जगताप, भास्कर कदम, विलास कदम, शरद कदम, महेश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी या कामाबद्दल मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाचे नेते डॉ.नितीन सावंत म्हणाले की,खऱ्याअर्थाने आज आपण बघतोय विकासकामे होत असताना आजच्या काळात प्रत्येक लोकांना अडचणीचा सामना करावा लागतो.हे सर्व महिला वर्ग असेल त्यांना महागाईचा फटका बसत आहे.घर चालविताना त्यांना अडचणी निर्माण होत आहेत.घरात कुणी आजारी पडलं तर ती गोष्ट फ़ार अडचणीची ठरते आहे. अशा परिस्थितीमध्ये ग्रामीण भागात एक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे पाणी आणि स्वच्छता राखणे गरजेचे आहे.इथे बंदिस्त गटाराची व्यवस्था झाल्याने याठिकाणी रोगराईला निश्चित आळा बसेल.हे काम आणण्यासाठी प्रयत्न करणारे आमचे सहकारी बंडू भोसले यांचे अभिनंदन करतो. खासदार श्रीनिवास पाटील यांचे आभार मानतो.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे म्हणाले की,लोणी या ठिकाणी सर्व ग्रामस्थांच्या उपस्थिती मध्ये माननीय खासदार श्रीनिवास पाटील साहेब यांच्या खासदार निधीतून ह्या लोणी गावांत विकास काम होत आहे.ह्या विकास कामाचे पूर्ण श्रेय खरंतर उद्योजक बंडू भोसले आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आशाताई भोसले या दोघांना जातं.घर कुटूंब हे कुणीही चालवत असतं.परंतु कुटूंबाबरोबर गावचा विकास करणं हे सुद्धा कर्तव्य मानून ह्या दोघांनी लोणीतच नव्हे तर इतर ठिकाणी सुद्धा खासदार साहेबांच्या माध्यमातून आणि डॉ.नितीन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकास कामांचा निधी ह्या तालुक्यामध्ये त्यांनी आणलेला आहे. परंतु आज तालुक्यामध्ये पाणी प्रश्न आणि इतर प्रश्नांवर आपण सातत्याने पाहतो की डॉक्टरांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अनेक वेळा आवाज उठविला आहे. सर्वसामान्य शेतकऱ्याला,जो सर्वांचा निर्धीत असलेल्या पाणी प्रश्नावर ते नेहमी बोलत असतात.शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे काम तालुकाभर सुरू आहे.मी पुनश्च आशाताई ह्यांना सर्व ग्रामस्थांच्या वतीने आपल्या गावच्या ज्या कन्या आहेत.

त्यांना ह्या सर्व कामाचे श्रेय जात आहे.त्यांना शुभेच्छा देऊयात. तसेच पुढील वाटचालीमध्ये सुद्धा त्यांनी अशाच पद्धतीने गावच्या विकासासाठी खासदार फ़ंड असेल किंवा इतर फांडातून निधी उपलब्ध करून द्यावा.त्यांना वेळोवळी डॉ.नितीन सावंत यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाच्या खंडाळा तालुकाध्यक्षा आशाताई भोसले म्हणाल्या की,खासदार साहेबांच्या निधीतून आणि सारंग बाबा यांच्या विशेष सहकार्यातून बंदीस्त गटर बांधणे हे काम मिळालेले आहे.सारंग बाबांनी हे आपल्याला काम दिलेले आहे.आणि इथून पुढे ही ते आपल्याला काम देतील.अशी माझी आशा आहे. आपल्याला शंभर टक्के त्यांना सहकार्य करायचं आहे.त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे आहे. आपल्याला आपल्या गावाचा विकास करून घ्यायचा आहे.असे सुद्धा त्यांनी म्हटले.या विकास कामाबद्दल ग्रामस्थांनी विशेष समाधान व्यक्त केले आहे.




# पोलिसांनी दिल्या महिला दिनाच्या शुभेच्छा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** 8 मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. जागतिक महिला दिनानिमत्त महामार्ग पोलिस केंद्र जिंतूरचे प्रभारी अधिकारी विनायक जाधव सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी शासकीय मुलींचे वस्तीगृह कस्तुरबा गांधी जिंतूर येथे उपस्थित राहून महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरणा बाबत तसेच त्यांचा उज्वल भावी आयुष्या बाबत योग्य ते मार्गदर्शन करून महिला दिनाच्या पुष्पगुच्छ देऊन शुभेच्या दिल्या या वेळी शासकीय वस्तीगृह कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय जिंतूर येथील वॉर्ड प्रमुख श्रीमती सविता इंगोले, श्रीमती एम. एस.पाटील तसेच पोलिस अंमलदार प्रकाश कोकाटे, अतुल कांदे, लक्ष्मण कदम, मनोहर हाके आदी उपस्थित होते.

# मुळाचे शेतीसाठीचे आवर्तन 50 दिवसानंतरही सुरुच

आधुनिक केसरी न्यूज

**विजय खंडागळे**

**सोनई :** मुळा धरणातील मुळा उजवा कालवा वरील शेतीसाठी सोडण्यात आलेले उन्हाळी आवर्तन 50 दिवस चालले असून पुढील दोन दिवसात आवर्तन बंद करण्यात येणार आहे. दरम्यान एप्रिल महिन्यात अखेरचे 30 दिवसाचं आवर्तन असणार आहे. धरणाने तळ गाठल्याने उन्हाळ्यात कमी कालावधीत सुटणारे आवर्तन मुळे पाण्याचा गंभीर प्रश्न भेडसावणारे चित्र निर्माण होणार आहे.

मुळा उजवा कालव्याचे उन्हाळी शेती आवर्तन दिनांक 15 जानेवारी रोजी सोडण्यात आले. सदरचे आवर्तन तब्बल 50 दिवस चालले असून पुढील दोन दिवसात हे आवर्तन बंद करण्यात येणार आहे. लाभ क्षेत्रातील राहुरी नेवासा शेवगाव पाथर्डी या तालुक्याला उन्हाळी आवर्तनाचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला असून तब्बल पाच टी एसी पेक्षा जास्त पाण्याचा वापर झाला आहे. सध्या धरणात 13. 5 टीएमसी पाणी साठा उपलब्ध असून चार टीएमसी मृतसाठा असल्याने केवळ पिण्याचे व औद्योगिक साठा राखीव ठेवून या हंगामातील शेवटच्या आवर्तनासाठी किती टीएमसी पाणी वापर होणार याकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागले आहे. एप्रिल महिन्यात शेतीसाठी अखेरचा आवर्तन



शिवाय कमी कालावधीत असल्यामुळे उन्हाळ्यात पाणीटंचाई भेडसावणार असल्याचे चित्र आहे. यावर्षी पावसाळा कमी झाल्याने मुळा धरणात केवळ ८५ टक्केच पाणीसाठा उपलब्ध झाला. त्यातच जायकवाडी धरणात मुळा धरणातून साडेतीन टीएमसी पाणी सोडल्याने लाभ क्षेत्रातील शेतीच्या सिंचनासाठी तालुक्यांना याचा मोठा फटका बसला धरण पूर्ण क्षमतेने न भरल्याने पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवली. उन्हाळ्यात अखेरचे आवर्तनाची नियोजन योग्य रीतीने झाल्यास काही प्रमाणात पाण्याची समस्या दूर होईल अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. धरणात साडेतेरा टीमचे पाणीसाठा उपलब्ध असून उन्हाळ्यात अखेरच्या आवर्तन तीस दिवसाचे असून याचे काटेकोर नियोजन केले जाईल असे मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी सांगितले.

# सावळदबारा येथे महाशिवरात्री अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** येथे विश्वशांती,



विश्ववकल्याण, मानवी जिवनाचा आत्मओध्वआर, लोकशिक्षण, जनजागृती, समाजप्रबोधन व समाज निर्मितीसाठी आणि आदर्श गावांचा संकल्प श्रमशक्तीद्वारे, ग्रामविकासाकरिता वै.ह.भ.प.रायभान बाबा कोलते व वै.ह.भ.प.आनंदबुवा सपाटे यांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दि.३/३/२४ ते ९/३/२४ गावकऱ्यांच्या वतीने हारि हारेश्वर विठ्ठल रुक्मिणी मंदीरावर करण्यात आले आहे.तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थाच्या वतीने गणेश खैरे व विशाल महाराज खडके यांनी केले आहे.श्रीमद भागवत कथा प्रवक्ता ह.भ.प.संजय महाराज गोंड ब्राम्हंदा आहेत. हारि हारेश्वर विठ्ठल रुक्मिणी मदीराचे सदस्य नेहमीच समाज प्रबोधन, सामाजिक कार्य असो की धार्मिककार्यअसो प्रत्येक कार्यात निस्वार्थपणे, हिरीरीने भाग घेऊन ते कार्य यशस्वीपणे पार पाडत असतात. अनेक धार्मिक उपक्रम यशस्वी करून दाखविले आहेत.

समाज प्रबोधन करणेसाठी ह.भ.प.गजानन महाराज सोनुने आळंदी देवाची,ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज शेलुदकर,ह.भ.प.बाल किर्तनकार कृष्णा महाराज करमाड,ह भ.प.मोहन महाराज गारमोड मलकापूर,ह.भ.प.माईसाहेब महाराज जळगावकर,ह.भ.प.अंबादास महाराज लोखंडे पारध,ह.भ.प.संजय महाराज गोंड ब्राम्हंदा यांचे सकाळी ९ ते १२ काल्याचे कीर्तन,गायनाचार्य ह.भ.प.रमेश महाराज सोनुने,ह.भ.प.किशोर महाराज गावडे,ह.भ.प.विशाल महाराज खडके, भागवत महाराज महाजन, सोपान महाराज मानकर, सुनील महाराज चव्हाण, संदीप महाराज चव्हाण असणार आहे.भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन गणेश उत्तम खैरे यांच्या कडून करण्यात आले आहे.काल हभप माईसाहेब जळगावकर यांचे जाहीर कीर्तन झाले याप्रसंगी ह.भ.प.याचां सौ.निहा गणेश खैरे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन मोठा सत्कार करण्यात आला. तरी आज पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अमृतवाणी चा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन गणेश खैरे यांनी केले आहे. हरिहर विठ्ठल रुक्मिणी मंदिरवर महाप्रसादाचे आयोजन-१२ ते ३ या वेळेत केलेले आहे.मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन गणेश खैरे व विशाल महाराज खडके यांनी केले आहे. गांवकरी मंडळी व हरिहर विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठानच्या वतीने प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा यांनी केले आहे.



# श्रीक्षेत्र बुधनेश्वर मढनगरी दुमदुमली

## शाहू परिवाराच्या वतीने संदीप शेळके यांच्याकडून साबुदाणा खिचडी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र बुधनेश्ववर संस्थान मढ येथील महाशिवरात्रीनिमित्त मढ व बुधनेश्ववर व दावणेश्ववर परिसरातील मंदिरे 'बम बम भोले, हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदूमून गेली होती.महादेव मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी मढ परिसरात येथील सर्वच शिवमंदिरांमध्ये सकाळपासून भाविकांची दर्शनासाठी व पूजेसाठी गर्दी पाहावयास मिळाली. महाशिवरात्र असल्यामुळे भाविकांनी महादेव मंदिरात मनोभावे हजेरी लावून शिवपिंडीवर श्रीफळ व बेलाची पाने अर्पण करून दर्शन घेतले. येथे नेहमीच वर्दळ असते. येथील भाविक भक्त,शेतकरी,कामगार व महिला कामगारांनी जवळच असलेल्या महादेव मंदिरांमध्ये सकाळपासून दर्शनासाठी रांग लावली होती. सोमवार हा देवांचा देव महादेव यांचा वार म्हणून ओळखला जातो. सोमवार करणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण लक्षणीय असते. यानिमित्त त्याला बेलाची पाने वाहण्यास भाविक प्राधान्य देतात. परिसरातील अनेक शिवमंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर दर्शनासाठी आलेल्या राजर्षी शाहू परिवाराच्या वतीने अध्यक्ष व वन मिशन बुलढाणा चे संकल्प मा.संदीप दादा शेळके यांच्या वतीने महाशिवरात्री निमित्त बुधनेश्ववर संस्थान मढ येथे केळी व फराळाचे वाटप करण्यात आले.यावेळी उपस्थित वालसांवगी शाखेचे व्यवस्थापक सागर दांडगे, प्रवीण शिंदे, अजिंक्य अल्हाट, स्वप्नील जाधव, आकाश भडगे, जीवन दातार, अमोल कोथलकर, विशाल वाघ, विकास रुस्तुके आदी भाविक भक्त भाविकांना साबुदाणा खिचडी व केळी महाप्रसाद म्हणून वाटण्यात आला.मढ परिसरातील अनेक ठिकाणी भजन, कीर्तन, शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण केले जात आहे. रात्रीच्या वेळीदेखील भजन गायन, तसेच संगीतमय कथा आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन महादेवाच्या मंदिरांमध्ये केले होते.

# सहा.गटविकास अधिकारी संदीपकुमार मोरे यांना शासनाचा गुणवंत अधिकारी पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** ७ मार्च रोजी बुलढाणा येथे जळगाव जामोद पंचायत समिती मध्ये कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष अधिकारी प्रभारी सहा. गटविकास अधिकारी संदीपकुमार मोरे यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांचे हस्ते महाराष्ट्र शासनाचा गुणवंत अधिकारी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संदीपकुमार मोरे हे एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेले कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून संपूर्ण तालुक्यामध्ये परिचित आहेत. आजरोजी पंचायत समितीमध्ये विस्तार अधिकारी पदावर कार्यरत असतांनाच त्यांची प्रभारी सहा.गटविकास अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. हीच खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याची पावती आहे. ग्रामीण भागातून अनेक लोक आपल्या समस्या घेऊन पंचायत समितीमध्ये येत असतात, त्यांचे समाधान करून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचं काम मोरे साहेबांकडून जबाबदारी पुर्वक केल्या जाते. एवढच नव्हे तर सामाजिक भान जपत त्यांनी तालुक्यांमध्ये अनेक सामाजिक कार्यात भाग घेत आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विशेषतः विशेषता कोरोना काळातील त्यांनी केलेले कार्य महत्वपूर्ण आहे. यासोबतच शासनाचे विविध उपक्रम प्रभावीपणे तालुक्यात राबविने, लाभार्थ्यांप्रयंत शासनाच्या योजना पोहचल्या पाहिजेत यासाठी ते नेहमी सतर्क असतात. पंचायत राज व्यवस्थेत ग्रामपंचायत ही सर्वात महत्त्वाची भुमिका पार पाडत असते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचा थेट संबंध ग्रामपंचायत आणि पंचायत समितीशी येत असतो.एका अधिकारी पदावर कार्यरत असुनही त्यांनी आपल्या अधिकारा व्यतिरिक्त काम करत तालुक्यातील सर्वच घटकातील लोकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे आणि आपुलकीचे संबंध आहे.त्यांनी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचा सर्वात महत्वाचा जागेचा असलेला प्रश्न सोडवत पंधराशेच्या वर लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे.विशेषतः आदिवासी भागातील लोकांसाठी त्यांनी केलेले कार्य महत्वपूर्ण आहेत.

यासर्व बाबींची दखल घेत त्यांना पुण्याच्या ग्लोबल स्कॉलर फाउंडेशन कडून भूषण पुरस्काराने सन्मानित आले आहे. सोबतच त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य लक्षात घेता महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकडून सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

नुकताच त्यांना महाराष्ट्र शासनाचा गुणवंत अधिकारी पुरस्कार बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन साहेब उपमुख्य कार्यकारी अधिकारी पवार साहेब इंगळे साहेब यांच्या हस्ते त्यांना गुणवंत अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व घटक गट विकास अधिकारी आणि इतर अधिकारी हजर होते.

त्यांना शासनाचा गुणवंत अधिकारी पुरस्कार सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे

# छोटा राजन आणखी एका खटल्यातून निर्दोष

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** व्यापारी सय्यद फरीद मकबूल यांच्या १९९६ साली झालेल्या हत्येच्या आरोपांतून विशेष सीबीआय न्यायालयाने कुख्यात गुंड छोटा राजन याची गुरुवारी पुराव्याअभावी निर्दोष सुटका केली. त्याचवेळी, कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याचा हस्तक असलेल्या एजाज लकडावाला याला मात्र विशेष न्यायालयाने त्याच्यावरील सर्व आरोपांत दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. दरम्यान, या प्रकरणामुळे राजनवर दाखल असलेल्या खटल्यांपैकी आणखी एका खटल्यातून त्याची निर्दोष सुटका झाली आहे.विशेष सीबीआय न्यायालयाचे न्यायाधीश ए. एम. पाटील यांनी लकडावाला याला हत्येसह शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. हुसैन यांच्यावर गोळीबार करणाऱ्यांपैकी एकजण लकडावाला असल्याचा पोलिसांचा आरोप होता. दाऊद आणि राजन यांच्यात त्याकाळी सुरू असलेल्या टोळीयुद्धादरम्यान हा हल्ला झाला होता. पोलिसांनी याप्रकरणी नोंदवलेल्या गुन्ह्यानुसार, ७ ऑक्टोबर १९९६ रोजी लकडावाला आणि त्याच्या साथीदाराने हुसैन यांच्या मोहम्मद अली रोड परिसरातील दुकानात घुसून गोळीबार केला होता. त्यानंतर, त्यात जखमी झालेल्या हुसैन यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्यांचा मृत्यू झाला. या गोळीबाराच्या वेळी, लकडावाला याच्या पायालाही गोळी लागली. त्याच्या पिस्तुलातून चुकून सुटलेली गोळी त्याच्याच पायाला लागली. त्याने आणि त्याच्या साथीदाराने त्याही स्थितीत पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी त्यांना पकडले.

# आयुष्यभर मी कार्यकर्ताच, मी पणा कधीच ठेवणार नाही !

## आ. लंके यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेले गोरेगाव येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** राजकारणात प्रवेश केल्यानंतर सुरवातीपासून संघर्ष केला. सत्तेचा उपयोग जनसामान्यांपर्यंत नेण्यासाठी राज्य सरकाराच्या योजनांचा अभ्यास करत कोट्यावधी रुपयांचा निधी मतदारसंघात आणला. आमदार झालो पण मी माझ्यात बदल केला नाही मी पणा कधीच ठेवणार नाही शेवटपर्यंत कार्यकर्ताच राहणार आसे मत आमदार निलेश लंके यांनी व्यक्त केले.
गोरेगाव( ता.पारनेर )येथील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीयोजनेचे भूमिपूजन,मौजे गोरेगाव ते किन्ही घाट रस्ता करणे,गोरेगाव येथे ब्राम्हणदरा रस्ता सुधारणा करणे,गोरेगाव मानमोडी सिमेंट कॉंक्रिट रस्ता करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह करणे अश्या २७ कोटी ६३ लाख रुपयांच्या कामांचे भुमिपूजन

व विविध कार्यकारी सेवा संस्थेचे कार्यालयाचे लोकार्पण आमदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके, उपसभापती बापूसाहेब शिर्के, बाबासाहेब



नांगरे,बबलु रोहकले, चंद्रभान ठुबे, अभयसिंह नांगरे,किरण ठुबे,संभाजी नरसाळे, प्रसाद नवले, उमेश नरसाळे,त्रिभवन लष्करे, चंद्रकांत शेलार, सुनिल नरसाळे,गणपत शेळके( सर ), प्रविण नरसाळे, अविनाश नांगरे, सुवर्णा नरसाळे, निलेश नरसाळे, रोहीत तांबे अनिल नरसाळे, तबाजी नरसाळे, बायसाबाई नांगरे, सागर नरसाळे उपस्थित होते. लंके म्हणाले, गावामध्ये काम करत असताना गावच्या विकासासाठी काय काय करता येईल याचा कायम पाठपुरावा अभयसिंह नांगरे व संभाजी नरसाळे व त्यांचा संपूर्ण समूह नेहमी करतो त्यामुळे मोठा निधी उपलब्ध झाला ते स्वतःसाठी कधीच काही मागणार नाही आशी ही विकासाची जोडी आहे.जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मोठा निधी मंजूर झाला आहे. याचे काम सुरू असताना नागरिकांनी बारकाईने लक्ष द्यावे अन्यथा काम पूर्ण झाल्यानंतर तक्रार करून काहीच उपयोग होत नाही हे पाण्याचे काम आहे वर्षांनुवर्षे परत अडचण येणार नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश नांगरे, प्रास्ताविक अंबादास काकडे यांनी केले.

**गीतांजली शेळकेंचा आदर्श घ्यावा :** जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष कै .उदय शेळके यांच्या अकाली निधनानंतर संचालक पदाची जबाबदारी गीतांजली शेळके यांच्यावर आली मात्र मी महिला आहे हे मला हे जमेल का, अशी भीती मनात न ठेवता त्यांनी ठामपणे ही जबाबदारी स्विकारत तालुक्यातील सर्व शाखांना भेटी देत तेथील अडचणी समजून घेत वेगाने काम सुरु केले इतरांना आदर्शवत काम त्यांचे आहे .– **आमदार निलेश लंके .**



## संजय गांधी निराधार समितीची बैठक; सहाशे अर्जावर विचारविनिमय

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** संजय गांधी निराधार समीतीची बैठक दि ७ मार्च रोजी तहसील कार्यालयात समीतीचे अध्यक्ष चंद्रसेन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तर सचिव तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या उपस्थितीत पार पडली, यावेळी समीतीचे सदस्य अशोक सोनकांबळे, श्रीमती सुप्रीया सचिन क्षीरसागर, एकनाथ तिडके, सचिन कुदळकर, पुंडलिक पाटील यांची उपस्थिती होती.

प्रारंभी तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी नुतन अध्यक्ष चंद्रसेन पाटील व सर्व सदस्यांचे स्वागत केले, व समितीच्या कार्यपद्धतीची माहीती दिली, यानंतर समितीकडे प्राप्त सहाशे अर्जावर विचारविनिमय करण्यात आला,यातील मंजुरी योग्य दोनशे ऐंशी अर्जावर समीतीने सहमती दर्शवत मंजुरी देण्यात आली. यावेळी या विभागाच्या लिपीक श्रीमती व्हि एस चाटे उपस्थित होत्या.

## कोपरगाव शहरात दिवसा ढवळ्या चोऱ्या

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहरातील दोन घरे बुधवारी दि.६ दिवसाढवळ्या चोरट्यांनी फोडलीअसून या दोन्ही घरफोडीच्या घटनेत २ लाख ५६ हजार रूपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी पळविला असल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेबाबत रात्री उशिरा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
कोपरगाव शहर आणि तालुक्यात दुष्काळाच्या झळा या वर्षी मोठ्या प्रमाणावर बसणार आहे.त्यामुळे चोरट्यांनी आपापले प्रताप दाखवण्यास सुरुवात केल्याचे आता उघड होऊ लागले असून अशीच एक घटना कोपरगाव शहरात दिवसा ढवळ्या घडली असून यातील
पहिली घटना साई गंगोत्री अपार्टमेंट,साईसृष्टी मध्ये घडली आहे.'साई गंगोत्री अपार्टमेंट'मध्ये रहिवासी असलेले शिक्षक आशिष श्रीराम पारडे यांचे घरी घडली आहे.पारडे हे कामानिमित्त बाहेर गेले असताना त्यांच्या घरावर पाळत ठेवत त्यांच्या घराचे कुलूप तोडुन अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला.त्यानंतर कपाटाची उचकापाचक करून कपाटातील ७५ हजाराचे सोन्याचे मंगळसुत्र,२५ हजाराचे मिनी मंगळसुत्र,३७ हजार ५०० रूपयांची सोन्याची चैन,२४ हजार रूपये किमतीच्या दोन अंगठ्या, २४ हजाराचे सोन्याचे कानातले व बारा हजाराची मुलाची सोन्याची चैन असा एकूण ०१ लाख ९७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी पळवून नेला आहे.घटनेची माहिती मिळताच घटनास्थळास शिर्डी उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने व शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रदिप देशमुख यांनी भेट दिली.पारडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा क्रं.३०१/२०२४ भा. द.वि.कलम ४५४,३८० अन्वये दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक संजय पवार हे करीत आहेत.
दरम्यान दुसरी घटना शहरातील बैलबाजार रोडवरील कृषी मित्र गृहनिर्माण सोसायटीत घडली.ज्येष्ठ विधीज्ञ रायभान तुकाराम भवर ( वय ८२ ) यांच्या घराच्या दरवाजाची कडी उघडून अज्ञात चोरट्याने प्रवेश केला.घरातील कपाट उघडून त्यातून ५६ हजार रूपये रोख, दोन मोबाईल,असा एकूण ५८ हजार ९०० रूपयांचा ऐवज लांबविला आहे.
दरम्यान या घटनेबाबत ॲड.भवर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास पो.हे.कॉ.ए.एम.दारकुंडे हे करीत आहेत.



## प्रवरा महाविद्यालयात सिंधुताई एकनाथ विखे पाटील स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**लक्ष्मण मडके**

**शेवगाव :** प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव येथे सिंधुताई एकनाथ विखे पाटील स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी प्रा. जयश्री सीनगर ( सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अहमदनगर उपकेंद्र समिती ) या उपस्थित होत्या त्यांनी बाईंच्या आठवणी ला उजाळा दिला. तसेच त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील योगदान महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले. तर प्राचार्य ओंकार रसाळ व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिंदे बी. टी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक वर. भालसिंग यांनी केले.तर सूत्रसंचालन प्रा.कातकडे रामदास व प्रा. प्रीती शिनगारे यांनी केले. प्रा. गणेश शेळके यांनी आभार मानले.
दुसऱ्या सत्रात विविध महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थी स्पर्धकांनी स्पर्धेच्या विषयावर आपले मत मतांतरे मांडली . ही स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली. यामध्ये मा. शाम शिंदे यांनी परीक्षक या नात्याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला.पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्षपदी मा. पंजाबराव आहेर साहेब होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बापूसाहेब भोसले हे होते. त्यांनी वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून भविष्यातील नेतृत्व, सामाजिक विचारक तयार होतात असे मत मांडले. व सिंधुताई यांनी केलेल्या बचतगट विषयक कार्याचे विश्लेषण केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मा. राजेंद्र विखे पाटील ( अध्यक्ष, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी ) मा. सुवर्णाताई विखे पाटील (विश्वस्त प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी ), मा. मोनिकाताई सावंत ( सहसचिव प्रवरा मेडिकल ट्रस्ट, शैक्षणिक संकुल शेवगाव, ) ध्रुव विखे पाटील (विश्वस्त प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी ) यांनी या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी बहुमोल मार्गदर्शन केले व विजेत्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या परिक्षणाचे कामकाज प्रा.डॉ. गजानन लोंढे, प्रा. शाम शिंदे, प्रा. सोपान नवथर यांनी पाहिले. व विद्यार्थ्यांना वक्तृत्व कसे करावे याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे पारितोषिक वितरण मा. प्राचार्य रमेश भारदेयांच्या हस्ते झाले. अनुक्रमे स्पर्धेत प्रथम बाफना सिद्धी विजयकुमार , द्वितीय शेख बिस्मिल्ला खलील, तृतीय वाकचौरे रोहित, उत्तेजनार्थ उशीर महेश व आरेकर प्राजक्ता यांनी क्रमांक पटकावला. तर स्पर्धेचा स्मृती करंडक दादापाटील राजळे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने पटकावले.

## विद्यार्थिनींनी डिजिटल प्रलोभनापासून दूर राहावे: वैभवी भोसले यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**फलटण :** महिला दिनाचे औचित्य साधून प्रियदर्शनी ज्ञानप्रबोधिनीच्या लॉ कॉलेज फलटण येथे महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या मार्गदर्शनाखाली प्री-लॉ प्रथम वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी निर्भया पथक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.यावेळी फलटण निर्भया पथकाच्या प्रमुख हेड कॉन्स्टेबल वैभवी भोसले यांनी विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन केले.विद्यार्थिनींनी डिजिटल प्रलोभनापासून दूर राहावे. असा सल्ला सुध्दा त्यांनी दिला.
विधी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अमित मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होत असताना यावेळी विचारमंचावर पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय भिसे,राणी कुदळे,नवनाथ कोळेकर, प्रा. ॲड.शिरीन शाह, श्रेया निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते. वैभवी भोसले म्हणाल्या की,अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल,पोलीस अधीक्षक समीर शेख तसेच फलटण उपविभागाचे उपविभागीय अधिकारी राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली आपली टीम महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी काम करीत आहे.कायद्याची साथ महिलांना आहे. कायद्याचा सदुपयोग करून त्यायोगे स्वतःचे व समाजाचे संरक्षण करावे; तसेच स्वतः समाजाचे पोलीस व्हावे व स्वतःसह सर्वांची जबाबदारी घ्यावी. समाज माध्यमांचा विवेकी वापर करताना स्वतःच्या व स्वतःच्या आप्तेष्टांच्या खासगीपणाचा (प्रायव्हसी) आदर करावा. सोशल मीडिया वापरण्यापूर्वी महाविद्यालयीन मुला-मुलींनी कशी काळजी घ्यावी याचे प्रात्यक्षिक सुद्धा त्यांनी दाखविले.निर्भया पथक फलटण विभागाचा ७३८७२४१०९१ हा संपर्क क्रमांक योग्यवेळी वापरण्याचे आवाहन विद्यार्थिनींना केले.
त्यासोबतच १००,११२ व १०९१ या संपर्क क्रमांकावर मदत मागितल्यास दहा मिनिटाच्या आत तुमच्यापर्यंत मदत पोहोचेल अशी ग्वाही दिली.पीडित महिलेने मदत मिळवण्यासाठी या संपर्क क्रमांकाचा वापर केल्यास सदर व्यक्तीची वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवली जाते. अशीही माहिती त्यांनी सुद्धा दिली.
कार्यक्रमाचे अध्यक्ष विधी महाविद्यालय फलटणचे प्राचार्य प्रा.ॲड.अमित मोरे म्हणाले की,प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी या मातृसंस्थेच्या घटनेत महिला उत्थान हे स्वप्न बाळगून बॅरिस्टर राजाभाऊ भोसले यांनी विधी महाविद्यालयाची स्थापना केली असल्याचे संदर्भ सापडतात. वरकरणी सुशिक्षित दिसणारी व्यक्ती कायद्याच्या बाबतीत जागरूक असेलच असे नाही; त्यामुळे कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी कायद्याची माहिती सर्वच सामान्यजनांपर्यंत पोहोचवावी असे आवाहन सुद्धा त्यांनी केले.
मनुस्मृतीच्या जोखडातून भारतीय स्त्रियांना बाहेर काढण्याचे काम राजमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन रॉय, 'समाजस्वास्थ्य' कार र. धों. कर्वे, व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान स्त्री-पुरुषांनी केले.असे प्रा.श्रेयस कांबळे यांनी प्रास्ताविकात सांगितले.
अष्टपुत्र सौभाग्यवती' असा आशीर्वाद देण्याऐवजी 'तुझ्या पोटी एक गोंडस मुलगी जन्मास यावी' असा आशीर्वाद का देऊ नये, असा सवाल ऐश्वर्या बनसोडे या विद्यार्थिनीने उपस्थित केला. शीतल अहिवळे, नुझर शेख, विशाल भोसले असू विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

# नमो चषक बक्षीस वितरण आ. बागडे यांच्या हस्ते संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** विधानसभा न फुलंब्री विधानसभा क्षेत्रात नमो चषक अंतर्गत सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाचा दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे (दादा) व माजी विधानसभा अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांचे शुभ हस्ते शुभारंभ करण्यात आला होता.

या सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवात हजारो क्रीडा व कला प्रेमींनी सहभाग नोंदवून स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना माजी विधानसभा अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या शुभहस्ते आज बक्षीस वितरण करण्यात आले.

यात खुला गटातील क्रिकेट स्पर्धेचे 51 हजार रुपयांचे प्रथम बक्षीस श्री प्रवीण जैस्वाल यांच्या मॉ शेरावली क्रिकेट संघ, रामनगर, द्वितीय बक्षीस ३१ हजार रुपये ग्रीन स्टार क्रिकेट संघ, चिकलठाणा, तृतीय बक्षिस २१ हजार रुपये वरूड वॉरियर्स क्रिकेट संघ तर वकृत्व स्पर्धेतील प्रथम बक्षीस ११ हजार रुपये प्रतीक्षा नरवडे, द्वितीय बक्षीस ७ हजार रुपये अदिती बागल, तृतीय बक्षीस ५ हजार रुपये अमोल जोशी, खुला गटात राहुल राजपूत, वैष्णवी चंद्रे, रवींद्र गरड, अभिषेक पळसकर, गीत गायन स्पर्धेतील प्रथम बक्षीस शाहीर पांडुरंग राकडे, रवींद्र सोळुंके, द्वितीय बक्षीस राजू विठ्ठलराव मोटे, दिपाली काटकर, योगिता कोके, सरला वाघ यांनी पटकावले.

याच बरोबर खो-खो, धावणे, चित्रकला,संगीत खुर्ची, हॉलीबॉल, कबड्डी,निबंध, रांगोळी व इतर विविध स्पर्धा फुलंब्री विधानसभा क्षेत्रात पार पडल्या. यातील विजेता,उपविजेता खेळाडू व संघांना माजी विधानसभा अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, संभाजीनगर तालुकाध्यक्ष डॉ.राधाकिसन पठाडे, माजी जि.प.अध्यक्ष रामराव शेळके, फुलंब्री तालुकाध्यक्ष सांडू अण्णा जाधव, दामु आण्णा नवपुते, श्रीराम बाबा शेळके, सजनराव मते, दीपक खोतकर, जिजा कोरडे, जितेंद्र जैस्वाल, अशोक साळुंखे, बळीराम कदम, शेखर दांडगे, सुदाम ठोंबरे, विजय काळे, बाळासाहेब तांदळे, सोमनाथ भालेराव, किसन ठुबे, सर्जेराव मेटे, गजानन नागरे, विकास गायकवाड, बंडू ठुबे, योगेश आंभोरे, नवनाथ शेटे, ऋषी नरवडे, गणेश कोलते, समाधान नवले यांच्यासह अधिक कार्यकर्ते व खेळाडू उपस्थित होते.

# पंचायत समितीची अभियंता प्रियांका लोहगावकर पतीसह लाच घेताना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी हाती घेतलेल्या आंदोलनामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्येही मोठ्या प्रमाणात जनजागृती होत असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारींचा ओघही वाढला आहे. धर्माबाद नगर परिषदेच्या कार्यालयात एक अभियंता व खाजगी एका असं मिळुन दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. थोडक्यात हकिकत यातील तक्रारदार यांचे नावे मौ. पाटोदा (बु.) ता. धर्माबाद, जि. नांदेड येथे गट क्र. ४४४ मध्ये एक एकर शेतीमध्ये त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून अहिल्याबाई सिंचन विहीर योजने अंतर्गत विहीर मंजूरीचा प्रस्ताव दि. ०८/०१/२०२४ रोजी पंचायत समिती धर्माबाद येथे दाखल केला होता.

सहायक कार्यक्रम अधिकारी, पंचायत समिती, धर्माबाद यांनी सदर प्रस्तावाची दखल घेवून टिपणी तयार करून तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी दिली. तक्रारदार यांनी तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांचे कडे सिंचन विहीरीचे कामासबंधाने चौकशी करण्यासाठी गेले असता, तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांनी तक्रारदार यांना रू.८०००/- ची मागणी केली. सदरची रक्कम रु.८०००/- ही लाच असल्याचे तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांना ती देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली. आज दि. ०७/०४/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पथकाने तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणीसाठी पाठविले असता, आरोपी लोकसेवक तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांनी पंचासमक्ष रू. ८०००/- ची मागणी करून तडजोडीअंती रू.६०००/- रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरून तांत्रिक सहायक श्रीमती प्रियंका लोहगावकर यांनी पंचायत समिती कार्यालय, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथे पंचासमक्ष रू.६०००/- लाच स्विकारून त्यांचे पती मकरंद काळेवार यांच्या कडे दिले. ला. प्र. वि., नांदेड पथकाने सदरची लाच रक्कम रु.६०००/- त्यांचे पती मकरंद काळेवार यांच्याकडून पंचासमक्ष जप्त केली. आलोसे चे पती खाजगी इसम यांनी लाचेची रक्कम आलोसे यांच्याकडून स्विकारून लाच घेण्यास प्रोत्साहन दिले. आरोपी लोकसेवक प्रियंका लोहगावकर, तांत्रिक सहायक व त्यांचे पती मकरंद काळेवार यांना ताब्यात घेण्यात आले असुन पो.स्टे. धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असुन पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत. विशेष म्हणजे याच महिलेने गेल्या आठवड्यात एका पत्रकाराच्या विरोधात तक्रार दिली होती की मला पत्रकाराने पन्नास हजाराची खंडणी मागत आहे व शारीरिक सुखाची मागणी करत आहे असे म्हणून पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती त्यानुसार त्या पत्रकारावर गुन्हा देखील करण्यात आला.

पत्रकार हा समाजातील लोकांना वारंवार सांगत होता की मी कसलीही मागणी केलो नाही तरी त्या महिलेने माझ्यावर खोटे आरोप करत म्हणून सांगत होता अनेक लोकांपासून विहिरीसह अनेक खाजगी कामा करून देण्यासाठी अनेक लाभार्थ्यांकडून पैसे घेत आहे, घेतले आहेत तिच्या सर्व व्हिडिओ शूटिंग, रेकॉर्डिंग, माझ्याकडे आहे. माझ्यावर गुन्हा दाखल करू नये अशी मागणी करण्यात आली होती पण महिलेने तक्रार दिली म्हणून तरीही त्याच्यावर गुन्हा दाखल झाला. त्या महिलेच सत्य जनतेच्या समोर पत्रकार आणते की काय म्हणून त्या महिलेने तक्रार दिली असावी व पत्रकारांना वर कारवाई केल्याने माझं कोणी काही करून घेणार नाही असा भरम आपल्या मनात ठेवून तिनं परत आपला लाच घेण्याचा कार्यक्रम दुसऱ्या दिवसापासून सुरू केला होता शेवटी देवाजवळ न्याय आहे अन्याय नाही म्हणून का होईना पण त्या महिलेला आज लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडले व त्याच्यावर पुढील कारवाई होत आहे सापळा कारवाई पथकात श्री कालीदास ढवळे, पोलीस निरीक्षक, सपोउपनि श्री गजेंद्र मांजरमकर, पोह/शेख रसुल, मपोह/मेनका पवार, चापोह/मारोती सोनटक्के,अँटी करप्शन ब्युरो, नांदेड हे उपस्थित होते.

> पत्रकारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रश्न केला की निलंबनास विलंब – लाचखोरांना रंगेहाथ पकडल्यानंतर त्यांना निलंबित करण्याचे आदेश विभागाकडून दिले जातात ; मात्र यामध्ये पोलिस खाते वगळता कुठल्याही विभागाकडून तातडीने कारवाई होत नाही तरी प्रशासने निलंबनाचे आदेश द्यावेत या प्रश्नावर अधिकारी उत्तर देताना म्हणाले ; हमखास कारवाई होणार – भ्रष्टाचाराविरुद्ध नागरिकांची जागरूकता वाढत आहे . कुठलाही तक्रारदार येताच हमखास कारवाई केली जाईल . लाचखोरांना शिक्षा झालीच पाहिजे, अशा पद्धतीने दोषारोपपत्र तयार करण्यात येतील . – कालीदास ढवळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मोबाईल क्र . 9623999944, 02462253512



# संचालक मंडळ बिनविरोध, चेअरमन-व्हाइस चेअरमनपदासाठी निवडणूक

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** खरेदी-विक्री संघ चेअरमनपदी आनंदा कोलते, व्हा. चेअरमन रामदास सोनवणे

फुलंब्री खरेदी-विक्री संघाची चेअरमन- व्हाइस चेअरमनची निवडणूक प्रक्रिया बुधवारी उपनिबंधक कार्यालयात पार पडली. यामध्ये चेअरमनपदी आनंदा नामदेव कोलते तर व्हाइस चेअरमनपदी रामदास सोनवणे यांची निवड झाली. अटीतटीच्या निवडणुकीत खरेदी-विक्री संघावर अखेर महायुतीने बाजी मारली आहे. तालुक्यात राजकीयदृष्ट्या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या खरेदी-विक्री संघाची निवडणूक जाहीर झाली होती. २३ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सतरा जागांसाठी महायुतीविरुद्ध महाविकास आघाडीच्या उमेद्वारांनी समझोता करून केवळ सतरा उमेदवारी अर्ज शिल्लक ठेवल्याने ही निवडणूक बिनविरोध घोषित करण्यात आली होती.

यामध्ये रंगनाथ कोलते, प्रल्हादराव डकले, विठ्ठल कोलते, लहू मानकापे, जनार्दन साबळे, दामोदर शिंदे, रामदास सोनवणे, आनंदा कोलते, नाथाजी काकडे, आजिनाथ पायगव्हाण, राहुल डकले, नारायण देवरे, शुभम गंगावणे, ज्योती फुके, आशाबाई पवार, दगडू मोरे, संजय ढेपले असे बिनविरोध संचालक निवडून आले होते. सर्व पक्षांनी एकमताने संचालक मंडळ बिनविरोध काढले होते. त्याचप्रमाणे चेअरमन व व्हाइस चेअरमनपदही बिनविरोध निघेल अशी तालुक्यात चर्चा होती. परंतु तसे न होता बुधवारी महायुती तसेच महाविकास आघाडी यांच्यात या पदासाठी मोठी रस्सीखेच झाली. बुधवारी सहायक निबंध कार्यालयात चेअरमन व व्हाइस चेअरमनपदासाठी निवडणूक घेण्यात आली. यासाठी महाविकास आघाडीकडून चेअरमनपदासाठी रंगनाथ कोलते व व्हाइस चेअरमनपदासाठी लहू मानकापे यांनी तर महायुतीकडून चेअरमनपदासाठी आनंदा नामदेव कोलते व व्हाइस चेअरमनपदासाठी रामदास सोनवणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या निवडणुकीत महाआघाडीच्या उमेदवारांना सात मते मिळाली, तर महायुतीच्या उमेदवारांना दहा मते मिळाली. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष सांडूअण्णा जाधव, कृमी उत्पन्न बाजार समिती उपसभापती दत्तू करपे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष राहुल डकले, बाळासाहेब तांदळे, विजय मोरे, बाबासाहेब तांदळे, जगन्नाथ दाडे, प्रदीप गाडेकर, सुनील तायडे, शिवाजी खरात, जनार्दन साबळे, तारूअपा मेटे, माधवराव जाधव, कलीम पटेल, दामू शिंद, रवी पवार, नारायण बांबर्डे, नीलेश बलांडे, सुदाम पवार आदी हजर होते.


# राष्ट्रीय महामार्गावरील अपघात तिघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यातील मलकापूर नजीक झालेल्या अपघातात किमान तीन जण ठार झाले. एक इसम गंभीर जखमी झाला असून वाहनात अडकला आहे. त्याला वाहनातून बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न पोलीस, समाजसेवी व नागरिक करत आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी बचावकार्य वाहतूक सुरळीत करण्यात व्यस्त आहे. यामुळे घटनेचा विस्तृत तपशील मिळू शकला नाही प्राथमिक माहितीनुसार राष्ट्रीय महामार्ग ६ वरील तालासवाडा फाट्या जवळ ही भीषण दुर्घटना घडली. ट्रक क्र. एम पी १४ ३७८६ आणि आयशर वाहन क एम एच १९ 19 सिएक्स ०९७७ यांची समोरासमोर भरवेगात धडक होऊन अपघात झाला आहे. यामध्ये ३ जण जागेवरच ठार झाले. १ इसम जखमी असून गाडीत अडकून आहे. त्यांना काढण्यात येत आहे.मार्गावर सध्या दुरुस्ती मुळे एकेरी वाहतूक सुरू असल्याने सदरचा अपघात घडल्याची चर्चा आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कष्टकरी महिलांचा शेतातील घरास भेट देऊन सत्कार !

## महिला दिनानिमित्त कुलस्वामिनी प्रतिष्ठान, भारतीय मारवाडी संमेलनचा नाविन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिन ८ मार्च च्या पुर्व दिवशी १६ शेतकरी महिला चा त्यांच्या शेतातील घरी जाऊन सत्कार कुलस्वामिनी प्रतिष्ठान व मारवाडी संस्था यांचे सयुंक्त विद्यमाने संभाजीनगर शहरातील नामांकित महिला यांनी सहभाग घेतला व सर्व कुटुंबाचा सत्कार केला. साडी व हार घालुन मीनाबाई दवंडे,सोनाली दत्ता दवंडे,जयश्री कृष्णा दवंडे,रेखा दवंडे,इंदुबाई रावसाहेनहिवर्डे,साधना किशोर हिवर्डे,निर्मला नारायण हिवर्ड,लताबाई बाबासाहेब हिवर्डे,पुष्पा प्रभु हिवर्डे,मनीषा बाळू हिवर्ड,अनिताबाई भाऊसाहेब हिवर्डे,अनिताबाई रमेश हिवर्डे,अश्विनी सुरेश हिवर्डे,पुष्पा देवनाथ हिवर्डे,नर्मदा गणेश हिवर्डे या महिलांचा यथोचित सत्कार करण्यात आला.तसेच त्यांच्या कुटुंबातील शेतकरी याना टॉवेल चा आहेर करण्यात आला.

विशेष म्हणजे शेतकरी महिलाच्या शेतातील राहत्या घरी भेट देण्यात येऊन त्यांचा दिनक्रम व कुटुंब बद्दल माहिती व शेतात पिकणाऱ्या भाजीपाला ब फळांची पाहणी केली.शहरातील महिला यांनी शेतकरी कुटुंबासोबत त्यांच्या घरी सकाळी नाश्ता ही घेण्यात येऊन,त्या महिला सोबत पारंपरिक खेळ फुगडी,झोका खेळण्यात आला. दुपारी एकत्रित बेसन-भाकरी ठेसाचे वन भोजन आंब्याच्या झाडाखाली करण्यात आले. कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कोरडे व सचिव सौ अलका कोरडे यांची ही संकल्पना होती. या उपक्रमास छत्रपती हा उपक्रम खुलताबाद तालुक्यातील खिर्डी या खेड्यात कोरडे यांच्या शेताजवळ करणात आला असुन मावसाला-खिर्डी या रस्त्यावरील सात घरातील कुटुंबाचा सत्कार करण्यात आला.

सौ अलका कोरडे, संध्या मापारी,अनिता अंभोरे,रमा नावंदर,स्वाती येडके,रंजना सामग, सावजी अंजली,सुरेखा सावजी ,माया कुलकर्णी,सुन्नदा लाहोटी,कांचन जैस्वाल,प्रमिला मुगदिया,संगीता भट्टड,नीता गादीया,उमा जैस्वाल,भारती मसी,भुरे शिल्पा,राठी मॅडम,मांडकीकर मॅडम या शहरातील महिला यांचा ही सत्कार कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे विलास कोरडे यांनी ज्वारी व पळस फुलांच्या गुलदस्त्यांनी केला. या वेळेस सर्व सात चारचाकी गाडी विशेष सजवण्यात आली होती. भगवान राठी यांनी रांगोळी काढली. कुलस्वामिनी चे चंद्रमुनी जायभाय,अनिल गावंडे,प्रल्हाद गायकवाड, मजहर मंडीवाला,गौतम आचारी,राहूल नावकर यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यास मेहनत घेतली.

सकाळी ९पासुन ४वाजेपर्यंत घर,शेत,राहणीमान कुटुंबाची विचारपूस व सोबत खेळ खेळत सांगता एकमेकास नैसर्गिक रंग लावुन रंगपंचमी खेळुन करण्यात आली. सर्व महिलांना खुलताबाद येथील भद्रा मारोती व वेरुळचे घृनेश्वर मंदिर दर्शन करण्यात आले. विलास कोरडे-शेतकऱ्यांची कष्टकरी महिला शेतात पती सोबत घर संभाळून अतिशय दिवसरात्र कष्ट करतात.सर्व शेतकरी कष्ट करुन हा पोशिंदा जगास अन्न धान्य,भाजीपाला देत असतात. यांच्या कुटुंबाचा सत्कार करून खुप आंनद झाला. लाहोटी सुनंदा-कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे महिला व मुलीसाठी गेली ११ वर्षपासून अशा सामाजिक कार्यात आम्ही सहभागी असतो.खुप आनंद झाला व गरीब कष्टकरी यांचे जीवन जवळूम अनुभवता आले.





# सहकार सेवा संस्थेच्या इमारतीचा किरण पाटील डोणगावकरांच्या हस्ते लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील सहकारी सेवा संस्थेची अध्यायावत बांधण्यात आलेली कार्यालयीन इमारत गुरुवार (ता:७) सकाळी अकराला विधी व पूजा होऊन जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकेचे व्हाईस चेअरमन किरण पाटील डोणगावकर यांच्या हस्ते फीत कापून लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष अनिल श्रीखंडे भाजप तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे सरपंच आप्पाराव नलावडे सहाय्यक निबंध V P रोडगे लेखा परीक्षक जे एच ठाकूर लोन ऑफिसर के बी काळे भाग चौकस निस ए एफ निकम पुंजाजी नलावडे वसंतराव नलावडे ए बी बनसोड चेअरमन किशोर नलावडे उप चेअरमन नवनाथ जाधव मुख्य सचिव एस पी जाधव तसेच आजी व माजी चेअरमन व सदस्यांची उपस्थिती होती

या इमारतीस 59 लाख रुपये खर्च आला असून एक सभागृह संस्था कार्यालय एटीएम रूम सेतू सुविधा केंद्र सहकार बँकेसाठी अपेक्षित कार्यालय यासह स्वतः चालवीत असलेले शासकीय स्वस्त धान्य दुकानांसाठी स्वतंत्र दुकानाची व्यवस्था अशी सुविधा आहे. ही सहकार सेवा एकमेव अशी संस्था आहे की 28 लाखांचे स्वयंपाक भांडवल असून चार कोटी रुपयांचे पीक कर्ज शेतकरी बांधव सदस्यांना वाटप केलेले आहे दरवर्षीची वसुली देखील 90 ते 92 टक्के असून काही मृत सभासदांमुळे शंभर टक्के वसुली पूर्ण करता आलेली नाही ही विशेष बाब आहे. या संस्थेत बाजार सावंगी सह परिसरातील इंदापूर झरी वडगाव रेल व शेखपुर या सहा गावातील 22०० शेतकरी बांधव या संस्थेचे क्रियाशील सभासद आहेत.

ही संस्था दिवंगत गवनाजी नलावडे भाऊराव नलावडे यांचा वारसा जपत असून त्यांनीच स्वतःची जागा व इमारत उभी केली होती ती आज वटवृक्षात रूपांतरित झालेली पाहावयास मिळते सूत्रसंचालन ज्ञानेश्वर नलावडे यांनी करून आभार सुखदेव जाधव यांनी मानले.

भिकन घुले, शरद जाधव, राजेंद्र सोनवणे, लहू नलावडे, पंडित नलावडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास परिश्रम घेतले.



# आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार विरतण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** महिला दिनाच्या निमित्ताने जिल्हास्तरावर आयोजित आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार यावर्षी वेरूळ तालुका खुलताबाद येथील अंगणवाडी सेविका श्रीमती रेखा हारकर डुकरे, शोभा पवार बाजार सावंगी, जनाबाई होळकर भगतवाडी यांना यावर्षीचा आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार व मंगल पाटील सावंगी निर्मला बिडवे वेरूळ, सुमन बन भडजी यांना आदर्श मदतनीस पुरस्कारयांना मुख्याधिकारी विकास मीना यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या अंगणवाडी ताई नी आरंभ आकार, बालसंगोपनात विशेष योगदान दिले त्यांना मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मिना, मा . उप.मु.का.अ तुपे, मा .मुख्य कार्यक्रम अधिकारी सुवर्णा जाधव यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र स्मृतिचिन्ह देण्यात आले. शोभा शिंदे पर्यवेक्षिका यांचे मार्गदर्शन लाभले असल्याची माहिती श्रीमती रेखा हारकर (डुकरे) यांनी दिली. श्रीमती रेखा सुभाष हारकर (डुकरे) यांना जिल्हास्तरावरील पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचे अभिनंदन वेरूळकरांनी केले.

# गोळेगाव जिल्हा परिषद शाळा अव्वलस्थानी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे गोळेगाव ची जिल्हा परिषद शाळा मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा उपक्रमांतर्गत खुलताबाद तालुक्यात अव्वल (प्रथम) स्थानी क्रमांक पटकावला आहे. मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यातून जिल्हा परिषद शाळा गोळेगाव यानी प्रथम क्रमांक पटकावला तर दुसरा (द्वितीय) क्रमांक जिल्हा परिषद शाळा मुंबै पुरवायची यांना मिळाला तर तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा कनकशीळ शाळेना मिळवला.तसेच खासगी शाळा मधून संत जनार्दन स्वामी प्रा विद्यालय वेरुळ प्रथम क्रमांक व नाथ माध्यमिक विद्यालय पिंप्री याने द्वितीय क्रमांक पटकावला.तर बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला असल्याची माहिती गटशिक्षण अधिकारी ( प्रभारी) व्हीसी केवट खुलताबाद यांनी दिली.मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा उपक्रमांतर्गत विविध उपक्रम शाळे राबविण्यात आले.

# भाजपा भटक्या विमुक्त आघाडीची जिल्हा कार्यकारिणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** भाजपा भटक्या विमुक्त आघाडीची छ.संभाजीनगर (दक्षिण)जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असुण यात खुलताबाद तालुक्यातील भाजपा कार्यकर्ते यांच्या वर्णी लागली आहे. भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष अजब सिंग राजपूत यांनी जाहीर केले आहे. यात खुलताबाद तालुक्यांतून कार्यकारिणीच्या उपाध्यक्ष पदी विजय चंदवाडे झरी,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीच्या जिल्हा सदस्यपदी विष्णू भारती म्हैसमाळ,बाळु भागीनाथ काटकर बाजार सावंगी,रमेश हरिभाऊ बोंबले येसगाव, संतोष सिंग घुसींगे खुलताबाद,सखाराम बापु कुकलारे गदाना,कृष्णा यादवराव पल्हाळ धामणगाव,अतुल राठोड धामणगाव तांडा आदि ता.खुलताबाद यांच्या वर्णी लागली असुण त्यांचे पक्ष कार्यकर्ते पदाधिकारी नातेवाईक मित्रमंडळी यांच्याकडून अभिनंदन होत आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर